महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील

केळकर समितीचा अहवाल

संक्षेपात



समर्थन प्रकाशन

समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

संपादक :
विवेक पंडित

संपादन सहाय्य:
मुक्ता भारती
रुपेश कीर
गुरुनाथ सावंत

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन - ११५-धुरी कॉमर्स प्लाझा,
वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर - ४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
९८९२९३९६१७/९९६७७२२९०७
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

मुद्रक :
प्रचिता ग्राफिक्स, मुंबई

लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील

केळकर समितीचा अहवाल

संक्षेपात

चर्चासत्रातील चर्चेवर आधारित टिपण

समर्थन प्रकाशन

प्रस्तावना

माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार राज्यशासनाने दिनांक ३१ मे २०११ रोजी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समतोल प्रादेशिक विभाग, उच्चस्तरीय समिती गठीत केली. समिती अंतर्गत पाच उपगट नियुक्त केले गेले. जून २०१३ पर्यंत समितीने अत्यंत परिश्रमपूर्वक हा अहवालाचे काम अंतिम टप्प्यावर आणले व ऑक्टोबर २०१३ रोजी हा अहवाल शासनाला सादर केला. त्याविषयी थोडक्यात —

आजच्या संपूर्ण महाराष्ट्रात ३ प्रमुख भाग एकत्र आहेत. या तिन्ही भागांना वेगवेगळी ऐतिहासिक, राजकीय आणि भौगोलिक परिस्थिती आहे. या सर्वांना जोडणारा दुवा हा मराठी भाषा हा होय. भाषावार प्रांत रचना करताना मराठी भाषिकांचे राज्य या अर्थाने हे तिन्ही भाग एकाच राज्यात आले. महाराष्ट्र राज्य उदयाला आल्यानंतर राज्यात वेगवेगळ्या भागात विभागांच्या तुलनेत (विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र) विकास कामांमध्ये असमतोल दिसू लागला आणि त्याविरुद्ध विकासात समतोल राहावा यासाठी मोठ्या प्रमाणात मागण्या येऊ लागल्या. विकासातील असमतोल हे वेगळे राज्य मागण्यामागील एक महत्त्वाचे कारण मानले जाते. ८०च्या दशकापर्यंत असमतोल विकासाबाबत भावना तीव्र होत गेल्याचे दिसते सन १९८३-८४ मध्ये तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा चव्हाण यांनी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ श्री. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली याचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमली गेली. विभागीय विकासातील असमतोल यावर आपल्या राज्यात प्रथमच तज्ज्ञाद्वारे असा अभ्यास करण्यात आला. दांडेकर समितीच्या योगदानामुळे अनेक गोष्टी जाणते समोर येण्यास मोलाची मदत झाली. अनुशेष ही गोष्ट सर्वसामान्यांच्या बोलण्यात येऊ शकली ती दांडेकर समितीमुळेच. असो दांडेकर समिती आणि त्यानंतर याच विषयावर एक दशकाहून अधिक काळानंतर परत वेगळी समिती नेमली गेली. तद्नंतर १९९९ मध्ये पुनश्च एका समितीची नेमणूक झाली व त्यानंतर सुमारे दीड दशकाने केळकर समितीची स्थापना मा. राज्यपाल यांच्या आदेशाने करण्यात आली. प्रत्येक समितीला त्यांच्या त्यांच्या नेमणुकीमध्ये ज्या मर्यादा घातलेल्या होत्या त्या त्या मर्यादेत विविध समित्यांनी त्यांची विकासाच्या असमतोलाची चिकित्सा केली होती. दुर्दैवाने केळकर समितीच्या पूर्वीच्या समित्यांचा भर हा शासकीय केला गेलेला खर्च (विभागानुसार) हाच मुख्य निकष वापरला गेला. याचमुळे शासकीय खर्चातील 'अनुशेष' ही बाब राजकीय चर्चेतच नव्हे तर सर्वसाधारण नागरिकांच्या चर्चेतही कळीची बाब ठरली. केवळ अनुशेष आणि तो ही पैशात उल्लेख केलेला उदा. अमुक इतके हजार कोटी इत्यादी. सदर बाब चर्चेसाठी मसालेदार वाटली तरी प्रत्यक्षात नियोजनात त्याचा कशा वापर करून समतोल विकास साधावा यासाठी अशी आकडेवारी फारशी पूरक झालेली दिसत नाही. यापूर्वीच्या काही समित्यांनी दर्शविलेली अनुशेषाची रक्कम भरून काढण्यास ५०हून अधिक वर्षे लागायची शक्यता काही अभ्यासकांनी आकडेवारीनुसार दाखवून दिलेली आहे.

विभागा-विभागांमध्ये विकासाचा असमतोल दिसून येतो याबद्दल वादच नाही. या असमतोलामुळे सर्वात जास्त चटके आणि त्रास हा त्या त्या विभागातील वंचित घटकांवर सर्वाधिक होतो. एकाच राज्याचा विविध विभागांचा विकास होता होई तो समतोल असावा यावर कोणाचे दुमत होईल असे वाटत नाही. महत्त्वाचा प्रश्न राहतो तो असा समतोल विकास साधायचा कसा ? असे विकासाचे अनुशेष कसे व किती काळात भरून काढायचे. ज्या विभागांमध्ये अनुशेष आहे त्यांना इतर विभागांबरोबर आणताना बाकी विभागांचा विकास थांबवून अनुशेष पूर्तता करायची की, विकास न

थांबवता यात राबवणूक योग्य पर्याय कोणते याचा साकल्याने विचार झाला पाहिजे. केळकर समितीने याचा विचार तुलनेने अधिक केला आहे. केळकर समितीने जरी १५० हून अधिक सूचना केल्या असल्या तरी त्याहून अधिक महत्त्वाचा अशा दोन गोष्टी ज्या या पूर्वीच्या अहवालात आलेल्या नव्हत्या. (कदाचित त्या त्या समितीवर असलेल्या मर्यादांमुळे असेल) त्या केळकर समितीत स्पष्टपणे पुढे आलेल्या आहेत.

सर्वप्रथम केळकर समितीची महत्त्वाची योगदान म्हणजे केवळ भौगोलिक विभागांवरच विसंबून न राहाता समितीने विकासापासून सर्वात वंचित घटक कोणते याचा स्वतंत्र विचार करण्यासाठी योग्य त्या आकडेवारीनुसार सर्व विभागात एकतर आदिवासी हे सर्वात वंचित असलेले दाखवून दिलेले आहे. त्याचबरोबर आपल्या राज्यातील पर्जन्याधारित कोरडवाहू (आणि त्यामुळेच) दुष्काळप्रवण भागांचा स्वतंत्र विचार केलेला आहे.

समितीच्या शिफारशींचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी तयार केलेले आदर्श तक्ते, ज्या योगे राज्य सरकारकडे किती रक्कम आहे या आकड्याला महत्त्व न देता उपलब्ध रकमेचा कशा पद्धतीने वाटप विनिमय व्हावा जेणे करून यापुढे नव्याने अनुशेषात भर न पडता जुना अनुशेष कशारितीने अधिक समतोल राखणारा होईल याचा शिफारस वजा तक्ताच दिला आहे.

जर राज्य सरकार या शिफारशीनुसार उपलब्ध महसुलाचे वाटप करणार नसेल तर त्यामागचे कारण त्यांना लोकप्रतिनिधी आणि अभ्यासक यांनी विचारणे सोपे झाले आहे. जर सरकार शिफारशीपेक्षा ही अधिक झुकते माप अनुशेषित विभागास देण्यास तयार असेल तर ते आता पडताळून पाहणे केळकर समितीच्या प्रयत्नाने शक्य होणार आहे.

केळकर समितीने वर उल्लेख केल्याप्रमाणे आदिवासी विभाग, पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेले भाग आणि असमतोल न वाढू देता समतोलासाठी काय करणे शक्य आहे याचा विचार केला आहे. त्याचबरोबर समितीने केवळ सरकारी महसुलाचाच मर्यादित विचार न करता विविध विभागात खाजगी भांडवलाच्या शक्यतेचा विचार त्या त्या विभागाच्या विकासासाठी कसा हातभार लावू शकेल याचाही उहापोह केलेला आहे. (दांडेकर समितीने केवळ सरकारी झालेला खर्च आणि सरकारने करावयाचा खर्च या पुरता मर्यादित विचार केलेला होता.)

ही पुस्तिका तयार करताना अत्यंत कमी वेळात करावी लागली. विधिमंडळ अधिवेशनाचा कालावधी लांबवला आणि केळकर समिती अहवालावर चर्चा करण्याचे ठरल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी याबाबत ‘समर्थन’कडे विचारणा केली. ५७१ पानांचा अहवाल संक्षेपात लिहिणे, अहवालावर अन्याय करण्यासारखे आहे. त्यामुळे हा संक्षिप्त परिचय आहे. संदर्भासाठी मूळ अहवालच वाचणे आवश्यक आहे. हे आम्ही इथे नम्रपणे नमूद करू इच्छितो. या टिपणात काही त्रुटी राहिल्या असण्याची शक्यता आहे. तरीही आपण स्वागत कराल आणि आपल्या बहुमूल्य सूचना द्याल अशी अपेक्षा करतो.

आमचे ज्येष्ठ स्नेही जे या समितीचे सक्रिय सदस्य होते ते प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ प्रा. प्रदीप आपटे यांचे मोलाचे मार्गदर्शन यासाठी लाभले. तसेच जनार्थचे प्रविण महाजन यांनीही मोलाच्या सूचना केल्या त्याबद्दल त्या दोघांचे मन:पूर्वक आभार.

- विवेक पंडित

महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील

केळकर समितीचा अहवाल

टिपण

केळकर समिती अहवाल हा ५७१ पानांचा आहे. तो मराठीतूनही आहे आणि इंग्रजीमधूनही आहे.

मात्र केळकर समिती अहवालाचा संपूर्ण गोषवारा या ठिकाणी विशद करण्याचा प्रयत्न केलेला नाही. कारण तो अनेक प्रकारच्या तपशीलांनी भरलेला आहे. शब्दमर्यादेचं भान ठेवून हा अहवाल संक्षिप्तपणे लिहिण्याचा प्रयत्न केलाय जेणेकरून या अहवालाची साधारण रुपरेषा वाचकाला कळेल. मुख्य उद्देश असा आहे की, हा अहवाल समजून घेताना, या अहवालाची रचना अशी का झाली? त्याच्या ज्या शिफारशी आहेत त्याचा रोख कसा आणि का आहे? हे आधी आपण लक्षात घेऊ.

दांडेकर समितीचा अहवाल पूर्णत: वाचला जाऊन तो स्वीकारला किंवा नाकारला असे झाले नाही. ज्यांनी त्यांनी आपल्या राजकीय सोयीसाठी त्याचा बाजूने किंवा विरोधी अर्थ लावला. या अहवालाचे काही वेगळे होईल अशी आशा बाळगता येईल अशी परिस्थिती निर्माण व्हावी अशी आपण सदिच्छा करू शकतो.

पूर्वी विदर्भ हा स्वतंत्र प्रांत नव्हता तर तो मध्यप्रांताचा हिस्सा होता. १९५३ साली फाजल अली कमिशन आले आणि त्या फाजल अली कमिशन समोर देखील विदर्भ स्वतंत्र असावा असे प्रतिपादन करणारे अनेक मोठे नेते विदर्भातले होते. नंतर काही कारणाकरता का होईना अंतिमत: भाषावर प्रांतरचनेमध्ये विदर्भ, मराठवाडा (हैद्राबाद संस्थानाचा भाग) आणि मुंबई व उर्वरित महाराष्ट्र असा महाराष्ट्र निर्माण झाला. उर्वरित महाराष्ट्रामधल्या लोकसंख्येची रचना लक्षात घेता, विदर्भावर त्यांचे राजकीय वर्चस्व राहील अशी भीती होती. या भितीपोटीच स्व. मान. यशवंतराव चव्हाणसाहेबांनी जेव्हा राज्य स्थापनेच्या वेळी पहिल्यांदा भाषण केलं. त्यावेळेला हे एक 'मराठी राज्य असेल. मराठा राज्य नसेल' असा स्पष्ट उल्लेख केला होता. विदर्भामध्ये फार निरनिराळ्या प्रकारचे सामाजिक समूह आणि जाती आहेत. जे पश्चिम महाराष्ट्रात आढळणार नाहीत. एकेका जिल्ह्यामध्ये एकेका जातीचे लोक फार मोठ्या प्रमाणात असणे हे विदर्भाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे हा एकीकडे राजकीय प्रतिनिधीत्वाचा प्रश्न होताच, पण दुसरीकडे आर्थिक विकास आपला सुद्धा अधिक होईल की नाही? त्यावेळेच्या लोकांची जी साशंकता होती, ती साशंकता त्या वेळेला पण होती अन् आजही आहे. आजही विदर्भामध्ये एकूण राजकीयदृष्ट्या प्रबळ असणारी धारणा ही विदर्भ स्वतंत्र व्हावा अशा वृत्तीची आहे. आणि ती तशी राहण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता आहे. याचा अर्थ विदर्भ स्वतंत्र राज्य होईल असे नाही पण ही भावना काही सहजी पुसली जाईल अशी आज परिस्थिती देखील नाही. तेलंगणा निर्मितीमुळे, लोकांना थोडीशी अशी आशा पल्लवित झाल्यासारखी वाटते की, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे विघटन करून विदर्भ राज्य जर झालं तर बरं होईल अशी फार प्रबळ भावना ही विदर्भामध्ये आहे. हा प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न फक्त

विदर्भापुरताच मर्यादित नाही तर त्याच्याशी दुसरा संलग्न असलेला पण राजकीयदृष्ट्या पूर्ण वेगळ्या प्रकारची पठडी असलेला जो भाग येतो तो म्हणजे मराठवाडा. या मराठवाड्यामध्ये स्वतंत्र मराठवाडा नावाची राजकीय चळवळ जवळपास नाही. मराठवाडा स्वतंत्र व्हावा आणि त्या आधारे काही तरी वेगळी विकासाची दिशा आणि गती गाठू शकू असा मराठवाड्यातील कोणीच अजून म्हणालेला नाही, म्हणण्याची शक्यता देखील वाटत नाही. काही प्रमाणात त्याचं कारण जे स्व. मान. यशवंतराव चव्हाणसाहेबांनी दिलं तेच आहे की, मराठी राज्य आणि मराठा राज्य असं दोन्ही एकत्रित करून मराठवाड्यात सहजी नांदू शकतं. हे सांगण्याचं कारणं असं की, केळकर समितीच्या अहवालामधले जर प्रकरण २ रे पाहिले तर त्याच्यामध्ये 'हितसंबंधितांचा दृष्टिकोन' म्हणून वेगळे प्रकरण मुद्दामहून घेतलेले आहे. अशा प्रकारच्या बैठका जिल्हावार, कधी कधी तालुकावार घेतल्या होत्या. परंतु त्याच्यामधून व्यक्त काय होणार आहे? आणि लोकांच्या आकांक्षा कोणत्या प्रकारच्या आहेत? आणि त्यांचं आकलन धोरणात्मकदृष्ट्या कसं करावं? हा दांडेकर समितीनं आपला स्वत:चा मुख्य कार्यभाग आहे असे केळकर समितीने मानलं आहे. दांडेकर समितीचा उल्लेख करण्याचं कारण असं की, जर विदर्भ स्वतंत्र राज्य असावं अशी जी सबळ राजकीय धारणा पूर्वीपासून होती आणि आज देखील या ना त्या कारणाने सतत धगधगती राहिली आहे. याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात दांडेकर समितीमुळे भर पडलेली आहे. एका अर्थानं म्हणजे की, आता लोक म्हणतात विदर्भ मागास आहे म्हणजे काय? याचे जे सर्व बोली भाषेत पसरलेलं आकलन आहे हे आकलन दांडेकर समितीनं काढलेल्या सूत्रानं अति प्रभावित झालेलं आहे की, 'विकास म्हणजे काय?' याचा विचार दांडेकर समितीमुळे प्रसृत झालेल्या सूत्राच्या बाहेर करायला लोक सहजी तयार नाहीत. हा समिती समोरचा सर्वात मोठा, किचकट आणि राजकीयदृष्ट्या संवेदनाशील असा प्रश्न होता आणि अजूनही तो आहे. दांडेकरांची समिती जेव्हा नेमली गेली. त्या समिती समोर जेव्हा याच प्रकारचे प्रश्न आले त्यावेळेला समितीने जाणीवपूर्वक असा निर्णय घेतला की, हा प्रश्न मुळात विकासाची पातळी आणि गती गाठण्याचा आहे. पण विकासाची पातळी आणि गती गाठणे हे अनेक घटकांवर अवलंबून असतं तर आम्ही सगळ्या घटकांमध्ये जाणार नाही. पण का जाणार नाही? याची काही त्रोटकपणानं नोंदलेली कारणं आहेत. की आता उदा. खाजगी गुंतवणूक. ती कुठे कशी व्हावी याच्याबद्दल कोणी काही सांगणं यावर अंतिमत: मर्यादा आहेत. जो तो व्यवसायाच्या हिशोबानं, व्यवसायाच्या सोयीनं निर्णय घेणार. या निर्णयाबद्दल आपण काही फार धोरण म्हणून जाणीवपूर्वक सरकार काय करू शकतं, तेवढ्याबद्दलच आम्ही करायच्या त्या शिफारशी करतो. असा दांडेकर समितीचा मूळ प्रस्ताव आहे. त्यामुळे दांडेकर समितीला जरी एकूण विकासाचा प्रश्न, पातळी आणि गतिचा प्रश्न महत्त्वाचा जरी वाटत असला तरी त्यांनी स्वत:च हे ल्यायलेले सोवळे आहे की, आम्ही या पलिकडे याचा विचार करणार नाही. हा पहिला मुद्दा, तो लक्षात घेतल्याशिवाय या अहवालाचा रोख कळणार नाही. म्हणून त्याचा इथे उल्लेख केला आहे.

सरकारी खर्चाच्या माध्यमातून जे जे काही होतं त्याच्यामध्ये जी विकासात तफावत पडली आहे ती तफावत दूर करण्यासाठी काय करता येईल हा दांडेकर समितीचा मुख्य विषय आहे असं त्यांनी ठरवलं. एकमतानं ठरवलंय का? तर एकमतानं ठरविलेले नाही. त्यात तीन भिन्न मतपत्रिका आहेत. त्यातील एक भिन्न मतपत्रिका ती आर्थिक युक्तीवाद म्हणून जरी चांगली असली तरी पुरेशी सबळ, फार नीटशी लिहिली गेली नाही. त्या सदस्याकडून हे सदस्य म्हणजे मराठवाड्यातील श्री. व्ही. व्ही. बोरकर. ते मराठवाड्यामध्ये प्राध्यापक होते. पण त्यांनी असा मुद्दा मांडला होता.

दांडेकर समितीचा हा दृष्टिकोनच बरोबर नाही. जास्त व्यापक दृष्टिकोन असायला पाहिजे असं श्री. बोरकरांचं मत होते. दुसऱ्या भिन्न मतपत्रिकेमध्ये जे मुद्दे आहेत ते एक श्री. श्री. या. देशपांडे, म्हणून जे नागपूरचे प्राध्यापक, दुसरे एक श्री. भुजंगराव कुलकर्णी, जे औरंगाबादचे पूर्वीचे रिटायर्ड आयएएस अधिकारी होते. दोघाचं मत असं होतं की, या प्रकारची जी काही विकासात तफावत पडली आहे, ती तफावत समितीच्या सूत्रानुसार जरी भरून काढायची असेल तर विधिमंडळ आणि त्याच्यातून निवडलं गेलेले मंत्रिमंडळ याच्या आधारानं हे काही सहजी होणार नाही. कारण हे त्याच्यामध्ये अध्यारुढ असे राजकीय अडथळे आहेत. ते जर दूर करायचे असतील, त्याच्या वरती वचक असणारा आणि त्याच्यापासून स्वायत्त असणारा असा वेगळा स्त्रोत पाहिजे की, ज्याच्यामुळे हे सरकारी खर्चातून येणारं तफावतीचं निराकरण होईल आणि त्यासाठी जी घटनात्मक तरतूद आहे त्या तरतुदीनुसार 'स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ' स्थापावं. अशा प्रकारची तरतूद विदर्भ, मराठवाडा, महाराष्ट्रात विलीन होऊन त्याची भाषावार पुनर्रचना होऊन ते मान्य होण्याच्या अगोदरच मंजूर झाली होती. ते अजूनही जिवंत आहे. तर ही महामंडळे राज्यपालांच्या अधिपत्याखाली यावी अगर कसे, याबद्दलच्या ज्या मतपत्रिका आहेत, त्या भिन्न मतपत्रिका होत्या. कारण समितीच्या मुख्य उपगटाने असं म्हटलं की अशी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याची गरज नाही. असे करण्याने लोकप्रतिनिधीच्या हक्कांवर गदा येते. मर्यादा येते, पायमल्ली होते. त्याच्यामध्ये खऱ्या अर्थानं प्रतिनिधित्व उरणार नाही इत्यादी, इत्यादी. अनेक विरोधी मते होती पण एकूणच आर्थिक विकासाचा प्रश्न आहे. आणि तो फक्त सरकारी खर्चातील झालेली तफावत एवढ्या पुरताच मर्यादित नाही, ही धारणा काही पहिल्यांदा उद्‌भवलेली नाही. ती अगदी क्षीण प्रमाणात का होईना असेल पण श्री. बोरकरांच्या भिन्न मतपत्रिकेमध्ये आहे. सांगायचं कारण असे की त्या वेळेला लोकांनी काय म्हटलं म्हणजे विदर्भातल्या लोकप्रतिनिधींनी काय म्हटलं, संसद सदस्यांनी काय म्हटलं, जिल्हा परिषद अध्यक्षांनी काय म्हटलं, वेगवेगळ्या विभागांच्या अधिकाऱ्यांनी काय म्हटलं, वेगवेगळ्या चळवळ करणाऱ्या संघटनांनी काय म्हटलं, संस्थांनी काय म्हटलं. याचं काही फार मोठं तपशीलवार संकलन हे दांडेकर समितीच्या अहवालात आढळून येत नाही. ते या अहवालामध्ये आहे आणि त्याचा जर तुम्हाला गोषवारा हवा असेल तर तो 'हितसंबंधितांचा दृष्टिकोन' या प्रकरणात आहे. हा एक दृष्टिकोन उचलून धरलाय, जो दांडेकर समिती मध्ये वगळला गेला होता. दांडेकर समितीने या तफावती बद्दल विचार करण्याचं आणि त्याच्या आधारानं वित्तीय तरतूद कशी करावी याचं जे सूत्र मांडलं होतं. त्या सूत्रांनी लोकप्रिय झालेला शब्द म्हणजे 'अनुशेष'. हा अनुशेष हा विकासात्मक कमी आणि वित्तीय जास्त राहिला. यातूनच वित्तीय तरतुदीचा आकडा किती फुगवता येईल आणि तो जेवढा मोठा असेल तितक्या प्रमाणात हा जो काही असमतोल आहे तो असमतोल दूर करण्यासाठी जास्त रक्कम लागेल अशी धारणा मागास भागामध्ये पसरली. जेवढी ही तरतूद त्यांना वाढविली जाईल तेवढी तरतूद आपल्याला कमी पडेल अशी धारणा उर्वरित महाराष्ट्रामध्ये बळावली आणि हे सर्व वित्तीय तरतूद किती रुपयांची याच्यामध्ये काढण्याची पद्धत आणि त्याचा आकडा याच्यामध्ये जणू लोकांमध्ये शर्यती लागल्या. कोण पुढं जातो आणि कोण मागं खेचतो यांच्यामध्ये विकासाचा विचार तुलनेनं कमी राहतो. हा सर्वसाधारणत: राजकीय वर्णनाचा भाग आहे. दांडेकर समितीचा अहवाल जवळपास पडून राहिला आणि त्याच्या शिफारशी या कधीही अधिकृतरित्या पूर्णतया पत्करल्याच गेल्या नव्हत्या त्यामुळे तो अहवाल योग्य होता की अयोग्य होता याची चर्चा करणे या अर्थाने पलिकडे आहे. आदरणीय श्री. दांडेकरांना पण याबाबत भयंकर वैषम्य होते

की त्यांनी एवढा प्रचंड अभ्यास करून, एवढे हिशोब केले की त्यांनी खरोखरच जी काही कामे केली ती खरोखर उल्लेखनीय होती. आज आपण महाराष्ट्राचं जिल्ह्याचे उत्पन्न किती, दरडोई उत्पन्न किती हे सर्व बोलू शकतो. त्यावेळेला अशी कोणतीही संख्याशास्त्रीय प्रणाली अस्तित्वात नव्हती. ती पहिल्यांदा सुरू करण्यामध्ये दांडेकर समितीचा मोठा हातभार लागला. दांडेकर समितीचा म्हणण्यापेक्षा त्या समितीमध्ये सदस्य असलेले डॉ. सोनावणे व श्री. सुधाकर विध्वंस, 'डायरेक्टर ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड स्टॅटिस्टिक्स' यांच्यामुळे महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणात बदल झाला आणि ही संख्याशास्त्रीय प्रणाली आज उभी राहिली. पण दांडेकर समितीचा अहवाल जर खरंच पत्करला गेला असता तर काय होऊ शकतं याचा एक स्वतंत्र विचार करणे शक्य आहे. आणि तो विचार का करावा याचं कारण असं की, १० वर्षे हा प्रस्ताव पडून राहिला. हा अहवाल पडून राहिला आणि त्याच्यानंतर १९९४ साली अंतिमत: ही वैधानिक विकास मंडळे स्थापन झाली. आता या विकास मंडळांनी करायचं काय? कशाच्या आधारावर काम करायचं? याच्यासाठी जी वित्तीय तरतूद द्यायची ती कशी आणि किती द्यायची? असे अनेक अनुत्तरीत प्रश्न होते. ते पुन्हा एकदा १० वर्षानं नव्यानं ही मंडळं स्थापन झाल्यावर समोर ठाकले. अनेक मंडळांसारखेच सुदैवाने वा दुर्दैवानं या मंडळांमध्ये नेमले गेलेले लोकप्रतिनिधी कमी पण जे निवृत्ती पंथाला लागलेले किंवा ज्यांना नजीकच्या भविष्यात निवृत्त करायचे, ज्यांना अन्य काही देता येत नाही म्हणून द्यायचं अशी जी आपल्याकडं महामंडळाची प्रथा आहे त्यापैकीच हे एक महामंडळ ठरलं. त्याचं नाव फक्त 'विकास मंडळ' होते. त्यांच्याकडे कोणताही विशिष्ट ठोस कार्यक्रम नव्हता. त्यांच्यापाशी कुठल्याही प्रकारची अधिकृत अंमलबजावणीची यंत्रणा नव्हती. उपलब्ध असलेल्या एकूण जमा, ज्याला आपण योजना खर्च म्हणतो त्या योजनाचा एक छोटा वाटा यांच्या नावानं दिला जात असे. पण त्यांची जी खर्च करणारी यंत्रणा होती, ती यंत्रणा अन्य शासकीय यंत्रणेचाच भाग होती. त्यामध्ये कोणतीही स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वातच नव्हती. हा प्रश्न आढावा पद्धतीनं १९९४ ते १९९५च्या पद्धतीनं हाताळला गेला. १९९७ साली पुन्हा याच्या पुनर्विलोकनासाठी एक समिती आली. त्या समितीमध्ये पूर्णत: फलद्रूप व्हावं असं काही निघालं नाही. सन्माननीय श्री. भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली दोनदा समिती नेमली. १९९९ साली पुन्हा एकदा 'बॅकवर्डनेस इंडिकेटर कमिटी' अशी समिती स्थापन झाली. ती ही सन्माननीय श्री. भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होती. या समितीनं जवळपास मोठ्या प्रमाणात पण बारिकसारिक तपशीलातले फरक आहेत जे क्षेत्रनिहाय ते सोडले तर दांडेकरांनी घालून दिलेल्या पठडीचाच या समितीने मोठ्या प्रमाणात अवलंब केला. आता आपण पुन्हा असं गृहित धरू १९८४ साली नाही तर १९९९ सालापासून जी निर्देशांक (इंडिकेटर) समिती आहे ती दांडेकरांच्या सूत्राशी बहुतेक मिळतीजुळती आहे. त्यानुसार खर्चाची तरतूद केली आणि खर्चाची जर विल्हेवाट करण्याचा प्रयत्न केला तर काय होतं? याचे दोन प्रकारे उत्तर देता येईल. एक उत्तर असे की, १९९९ ते २००९ काय झालं? आणि २००९ ते पुढे २०१२ पर्यंत न थांबता हे सगळं चालू राहिलं असतं तर काय झालं असतं ? हे दोन स्वतंत्र प्रश्न आहेत. याच्यातला पहिला प्रश्न जो राजकीयदृष्ट्या खूप महत्त्वाचा आहे. याचं उत्तर मिळणं जवळपास अशक्य आहे आणि तो म्हणजे, खरंच खर्च किती झाला? याचं उत्तर नियोजनामध्ये दाखविलेल्या शीर्षाखाली असलेल्या तरतुदी म्हणजे प्रत्यक्ष खर्च कुठे झाला? म्हणजे प्रादेशिक, भौगोलिक अर्थाने कुठे झाला याचा ताळमेळ घालण्यासारखा संख्याशास्त्रीय पाया फक्त वर्ष २०१२-१३ नंतर अल्पप्रमाणात तयार होऊ शकला. त्याच्या

अगोदर तो अस्तित्वात नाही. याच कारण असं की खर्च विदर्भात झाला तरीसुद्धा त्याच खर्चाचे जे विवरण असतं, खर्च झाल्याची बँकमध्ये जी आवकजावक असते, याची नोंदणी कोणत्याही ट्रेझरीमध्ये होऊ शकते म्हणजे नोंदणी पुण्यात झालेली असते आणि खर्च प्रत्यक्षात विदर्भात झालेला असतो, आणि उलट देखील. त्यामुळे खर्च नेमका कुठे व किती झाला याचा छडा लावणं हे आताच्या उपलब्ध असलेल्या संख्याशास्त्रीय आणि लेखाप्रणालीमध्ये जवळपास अशक्य आहे. त्यामुळे जर कोणी असं म्हटलं हे पैसे वळवले गेले तर त्याला हो किंवा नाही असं कोणतंही निर्णायक उत्तर छातीठोकपणे देता येण्यासारखी परिस्थिती आज नाही. म्हणजेच राजकीयदृष्ट्या असंच राहणार की पैसे वळवले गेले ही भावना अधिक दृढ आणि अधिक तजेलदार राहण्याची शक्यता जास्त आहे. हे लक्षात घेऊन कमिटीनं त्यांच्याच काळामध्ये आग्रह धरल्यामुळे ज्या प्रकारची अकांउटिंग सिस्टीम 'कॉम्प्युटरराईज अकांउटिंग ट्रॅकिंग सिस्टीम' आहे, या ट्रॅकिंग सिस्टीममध्ये 'डेस्टीनेशन प्रिन्सिपल' आणायचा प्रयत्न केला. तो मूळ डेटाबेसमध्ये नव्हता. हे सर्व कार्यरत होऊन दोनच वर्ष झाली आहेत त्यामुळे याच्या अगोदरचा इतिहास अख्खा सर्व खोदायचा म्हटला तर जवळपास नव्यानं पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याची स्थापना केलेले बरी, इतका तो किचकट विषय आहे. त्यामुळे हे काही प्रत्यक्षात होणार नाही. निधी वळवला गेला नाही का? असं आपल्याला का म्हणता येत नाही याची तुम्हाला कदाचित पुरेशी कल्पना असेल. आपल्याकडे जेव्हा अंदाजपत्रक सादर होतं, ते अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर 'सप्लीमेंटरी बजेट' या प्रोसेसमध्ये डिपार्टमेंटचा निधी (Grant) ज्या पद्धतीने बदलतात आणि 'ॲडिशनल डिमांड फॉर ग्रॅण्ट' (Additional Demand for Grant's) या ज्या रीतीने येतात त्या नेहमीच सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये. अनेक विभागाच्या, विभागाअंतर्गत किंवा दोन विभागांमध्ये पुनर्वाटप होतं आणि त्यानुसार प्रत्यक्ष खर्च होतो आणि हा खर्च मूळ अंदाजपत्रकामध्ये दाखविलेल्या रकमेपेक्षा फार वेगळा असू शकतो. त्यामुळे प्रत्येक अंदाजपत्रकामध्ये अंदाजित, सुधारित व प्रत्यक्ष रकमां यामध्ये जो निधी वळताना (Diversion) दिसतो तो जेव्हा खात्याच्या लेव्हलवर बघता त्यावेळी तो छोटा दिसतो. पण खात्यामधला विभागाअंतर्गत निधी खूप मोठा असू शकतो. याच्याकडे बघायला पाहिजे कारण खरोखर जिल्ह्याकडे वळणारा पैसा मोठ्या प्रमाणात विभागाअंतर्गतही असतो. उदाहरणार्थ एखादी योजना अमरावती साठी होती. मात्र त्यावर खर्च करायला तिथे अधिकारी नाही किंवा लाभार्थी सापडले नाहीत, अशा कोणत्याही कारणासाठी ती योजना तिथे खर्च करण्यात येण्यासारखी नसेल तर, ती अन्य जिल्ह्याकडे वळू शकते. तर पैसे वळवले गेले नाहीत किंवा आहेत याच्या बाबतीत निर्णायक उत्तर देण्यासारखी क्षमता महाराष्ट्र सरकारमध्येच नाही तर समितीमध्ये तर त्याहूनही नाही. कारण समितीला शेवटी सरकारकडून जी आकडेवारी मिळते. त्यानुसारच छाननी करू शकते. पण सिंचनाबद्दल असे झालेलं दिसतं की, पैसे उभे केले, खर्च झाले नाहीत, काही पैसे असे होते की खर्च झाले नाहीत पण वळवता येत नव्हते पण त्याच्यासाठी देखील अनेक प्रकारच्या लेखाशास्त्रीय क्लृप्त्या असू शकतात. पैसे उभे केले आहेत पण पडून आहेत. पण उचल घेता येते आणि ती अन्यथा इतरत्र कुठल्यातरी विभागाला नेता येते. सरकारकडे आलेली रक्कम कुठल्या विभागाकडे कुठल्या कारणानुसार गेली याचा छडा लावणं हे फार कठीण असतं. असं झालेले आहे की विदर्भाकडे देखील मोठ्या प्रमाणात कर्जाने उभे केलेले पैसे ते विदर्भासाठी खर्च झालेले नाहीत याची कारणं अनेक आहेत. ते पैसे वापरलेच गेले नाहीत असे तर कुणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही. कारण जर सरकारकडे उपलब्ध पैसे असे वळवता येत नसतील तर

सरकारला लवचिकता पाहिजे. जी काही खर्च करण्याची लवचिकता पाहिजे ती काढून घेण्यासारखी होईल. किंबहुना रोजगार हमी योजना या योजनेबद्दल हे वारंवार करायला लागायचं कारण जिल्ह्याकडून मोठ्या प्रमाणात मागणीच आली नाही, कामेच सुरू झाली नसतील, अमुक एक ठिकाणचा शासकीय अधिकारी कार्यक्षम नसेल तर ती रक्कम उपलब्ध असूनही खर्च होत नाही. पण तो निर्माण केलेला निधी असल्याने पडून राहतो. याच पद्धतीने विदर्भासाठी असलेला काही निधी जो एरव्ही योजना खर्चामध्ये किंवा योजना कर्जा मध्ये असेलच असेही नाही पण तो वापरला जाऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न बहुंशी अनिर्णित आहे. यांच्या बद्दल काहीही सांगता येणार नाही. विदर्भातल्या प्रशासनामध्ये, विदर्भातील योजनांमध्ये असलेल्या अडचणींमध्ये, आणि विदर्भामधल्या राजकीय नेतृत्वामुळे या तिन्ही कारणामुळे एखाद्या योजनेसाठी निधी उपलब्ध असून खर्च झालेला नाही, अशी मोठी यादी देखील तयार करता येईल. यासाठी उपलब्ध असलेल्या माहितीचे एकूण स्वरुप लक्षात घेता समितीने या प्रश्नांना हात घातलेला दिसून येत नाही कारण छातीठोक पणानं म्हणावं अशी माहिती आज उपलब्ध होऊ शकलेली नाही असे दिसते. त्यामागे काही राजकीय अडचण असू शकते. उदाहरणार्थ, पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये साखर धंद्याचे मोठे प्राबल्य आहे. बहुतांशी सहकारी साखर कारखान्यांना महाराष्ट्र सरकार हे जामीनदार असते तेच भागभांडवलदारही असते आणि कर्ज पुरवठादार असते. कारण सरासरीनं सांगायचं तर १० रु. गोळा करायचे शेतकऱ्याने, ४० रु. राज्य सरकारने भरायचे, जमा झालेल्या ५० रुपयांच्या दाखली पोटी ५० रु. कर्ज एन. सी. डी. सी. सकट अन्य बँकांनी द्यायचे असे भांडवलाचे १०० रु. उभे राहतात. कालांतरांने हे ४० रुपये कारखान्यांनी महाराष्ट्र सरकारला फेडायचे असतात. अर्थातच उरलेले ५० रुपये आहेत जे बँकांकडून घेतले ते बँकांना फेडायचे, अशी ती मूळ योजना आहे. एवढ्या निकषावर जरी बघायला गेलं तरी विदर्भातला एकही कारखाना हा परतफेडीच्या दृष्टीने उभा राहू शकत नाही. त्याची कामगिरी सर्वात वाईट आहे. असेच महामंडळाच्या विशेषत: सिंचनाशी संबंधित महामंडळाबद्दल म्हणता येईल. विदर्भातले अनेक प्रकल्प रखडतात याचे कारण, ज्या प्रकारच्या जमिनीवरती जंगल म्हणावं असे जंगल नाही. पण जंगल खात्याने त्याची नोंद जंगल म्हणून केली आहे. अशा प्रकारची जंगले त्याला 'झुडूपी जंगले' म्हणतात, त्या झुडूपी जंगलाखाली येणारी जमीन हे कारण दाखवून पर्यावरणाच्या आधारानं आणि वन जमीन जाते या सबबीनं अनेक प्रकल्प हे रखडलेले आहेत. आता या प्रकल्पांसाठी लागणारे कर्ज आणि त्याचा निधी उपलब्ध आहे. परंतु तो प्रत्यक्षात वापरताच येत नाही. दुसरं सिंचन खात्याकडे तरतूद आहे पण तिथलं सिंचन खातं इतकं कार्यरत नाहीय की भराभर तो निधी उचलण्यासाठी लागणारे जे टप्पे असतात ते पूर्ण करावेत आणि त्याची अंमलबजावणी करत जावी. हा काही अंशी प्रश्न हा राजकीय नेतृत्वाचा ही असतो. ही झाली विदर्भाची स्थिती. याउलट उर्वरित महाराष्ट्रामधल्या अनेक भागांमध्ये, पश्चिम महाराष्ट्रामध्ये विशेषत: सर्व राजकीय नेतृत्व प्रत्येक टप्प्याला काम अडून राहणार नाही आणि ते गतीने पुढे कसे जाईल यासाठी इतके पायाला चाकं लागून पळत असते की हे पैसे खर्च होतात, कमी पडले तर अन्यत्र वळवून खर्च होतात किंवा बजेट वाढवून खर्च होतात, पण तसे विदर्भात झालेले दिसत नाही. आणि याच्यामध्ये सर्वात दुर्दैवी असणारा मराठवाडा विभाग आहे. केळकर समितीने असे म्हटले आहे की, मराठवाडा आणि विदर्भ हे आर्थिकदृष्ट्या मागास आहेतच. कोणत्या निकषाने ते मागास आहेत हे तपासण्यासाठी वेगळे निकष या समितीने वापरले आहेत. ते मुख्यत: दरडोई उत्पन्न, औद्योगिकीकरण, विजेची उपलब्धता आणि वापर, शिक्षणाचे प्रमाण आणि

उद्योगांचे प्रमाण यावरती आधारित जो निर्देशांक तयार केलाय, त्याच्या आधाराने ते मागास आहे असं समितीने ठरवले आहे. जिल्ह्याचे मागासलेपण देखील मुख्यत: या पाच निर्देशांकावरती ठरवले आहे. हे निर्देशांक घ्यायचे कारण समितीच्या नेमणुकीच्या वेळेला स्पष्ट केलेले आहे. यापुढे जो काही खर्च व्हायचा असेल, त्याच्यापुढे कोणत्या आधाराने विकासातला असणाऱ्या कमतरतेचा विचार केला जावा हे निश्चित करण्यासाठी म्हणून हे निर्देशांक दिले आहेत. आणि हेच निर्देशांक वापरून त्यांच्या मागासपणाचे जे काही विश्लेषण किंवा मागासपणाचे जे काही निदान केले ते बहुंशी या निर्देशांचा आधारानेच केलेले आहे. आता सर्वात महत्त्वाचा कळीचा प्रश्न, जो समितीला हाताळावा लागला. यासंदर्भात खरंतर दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. याआधी नमूद केल्याप्रमाणे एक म्हणजे दांडेकर समितीने ज्या रितीनं विकासाची अनुशेषाची व्याख्या केली, त्या कल्पनेचे जे काही भूत आहे. ते साऱ्यांच्या डोक्यातून कसं काढायचे हा पहिला मोठा प्रश्न आहे. दुसरा मोठा प्रश्न, विकासाचा निधी अन्यत्र कुठे वळता होणार नाही, तो त्या भागातच जाईल आणि त्या भागाचा झपाट्याने आर्थिक विकास, सरकारी किंवा बिगर सरकारी खर्चामधून होईल यासाठी लागणारी जी संस्थात्मक यंत्रणा आहे, ती संस्थात्मक यंत्रणा ही घटनेमध्ये सुचवलेल्या यंत्रणेसारखी असावी की अन्य असावी की ज्याच्यामुळे राजकीय प्रतिनिधींना जबाबदारी घ्यावी लागेल आणि प्रत्यक्षात सहभाग पण मिळेल. अशा प्रकारची कुठली पर्यायी व्यवस्था तयार करता येईल का? हे दोन प्रश्न समिती समोर असावेत. दुसरा प्रश्न जो आहे तो असा आहे, ज्याला आपण वैधानिक विकास मंडळ म्हणतोय त्या वैधानिक विकास मंडळाचा मुख्य हेतू काय? हा मागासलेपणा दूर करण्यासाठी या विकास मंडळांना राज्यपालांच्या अखत्यारित ठेवून, त्याच्या मुखत्यारी खाली, त्याच्या निरीक्षणाखाली खर्च करणे जेणे करून हा मागासलेपणा दूर होईल याच प्रकारचे काम हे राजकीय प्रवृत्ती दूर ठेवून करता येईल का? या अर्थाने त्याची पुनर्रचना शक्य आहे का? हा दुसरा प्रश्न आहे. कारण हितसंबंधितांच्या समितीमध्ये तिथल्या सदस्यांसकट सगळ्यांनी असं म्हटलयं की ही यंत्रणा कुचकामी आहे. याच्यातून काहीही साध्य होण्यासारखं नाही. याला काहीतरी पर्याय शोधला पाहिजे. या दोन प्रश्नांची आपण इथे सर्वप्रथम चर्चा करु. दांडेकर समितीच्या सूत्रानुसार असे आहे की, ज्या जिल्ह्याचे निर्देशांक राज्याच्या सरासरीपेक्षा खाली आहेत ते मागास व वरती जे आहेत ते तुलनेने बरे आहेत. इथे जिल्हा हे युनिट आधारभूत घेतले आहे. मात्र विभागवार समतोल विकासाबाबत बोलताना असाही मतप्रवाह आहे की तालुका हे युनिट असावे. अनुशेष तालुकानिहाय घेतला तर अनुशेषाचा आकडा तुलनेनं आज पेक्षा फुगताना दिसतो. विकास कुठल्या पातळीवर मोजायचा हा निकडीचा प्रश्न आहे. केळकर समितीने विकास मोजायचे युनिट जिल्हा हेच ठेवलेले आहे. त्याचे सर्वात मोठे सबळ कारण असे की जिल्ह्याच्या बाबतीत या अर्थाने भरोसा ठेवावा अशी आकडेवारी उपलब्ध आहे. अशा प्रकारची जिल्ह्याइतक्या गुणवत्तेची आकडेवारी तालुका पातळीवर दुर्दैवाने आज उपलब्ध नाही आणि जर विभाग हे युनिट मानलं तर, रोग निदानाच्या दृष्टीनं 'विभाग' अनुकूल घटक नाही. विकास मापायचे युनिट फार मोठे ही नसले पाहिजे आणि इतके छोटे ही नसले पाहिजे कारण आपण जेवढं खोलात जाऊ तेवढी व्यामिश्रता अधिक. एकदा हे चक्र सुरू झाले की तालुक्याचं का युनिट घ्यावं, गाव हे अतिसूक्ष्म युनिट का घेऊ नये? असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो. चहाला का थांबावं, पाण्याला का नेऊ नये असं करता करता शेवटी फक्त एक व्यक्ती हा घटक का घेऊ नये? असाही प्रश्न पडतो. कुठतेरी संख्याशास्त्राच्या दृष्ट्या सरासरी म्हणावं अशा योग्य पातळीवर थांबावे लागते. या दृष्टीने तूर्तास तरी 'जिल्हा' हा अधिक उपयुक्त घटक केळकर

समितीला वाटला आहे. म्हणून जिल्हा हा प्रमुख घटक धरून विकासाचा अनुशेष काढलेला आहे. दांडेकर समितीने प्रत्येक क्षेत्रानुसार वेगवेगळी तफावत आहे असे सांगितले. सुरुवातीला विकासाचे निर्देशांक नऊ होते. नंतर ते १८ झाले, आता अधिक वाढले. उदा. प्राथमिक शाळा किती आहेत? दर हजारी लोकसंख्येला महानगरपालिका क्षेत्रात अमूक एवढ्या शाळा तयार होण्यासाठी, जी तफावत आहे ती कमी करण्यासाठी, अजून किती शाळा लागतील? अजून किती शिक्षक वाढतील? एक शाळा बांधण्यासाठी खर्च किती लागतो? एक शिक्षक नेमायला किती खर्च लागेल? तेवढ्या गरजा पूर्ण केल्या खेरीज त्यांना दर हजारी असलेल्या शाळांचे प्रमाण, शिक्षकांचे प्रमाण हे राज्याच्या सरासरीला नेऊन ठेवता येणार नाही. यात काही प्रमाणात अडचणी आहेत. मात्र जे पुढं आहेत त्यांना पुढे जायला देऊ नका तरच जे मागे पडले आहेत त्या सर्वांना बरोबर आणता येईल, असा याचा एक अभिप्रेत अर्थ आहे. दुसरे, जो सर्वात जास्त महत्त्वाचा प्रश्न आहे. अशाप्रकारचे जे अहवाल लिहिले व प्रकाशित केले जातात त्यात अमुक एक मागे राहिले, अमुक दुसरे त्यांच्यापेक्षा पुढे गेले हे वर्णनात्मकदृष्ट्या ठीक आहे. पण प्रत्यक्षामध्ये त्यावेळेला तो खर्च करण्यासाठी लागणारा १) कालावधी २) त्या प्रकारची प्रशासकीय गुणवत्ता आणि क्षमता, प्रत्येक जिल्हामध्ये असतात. त्या वेगवेगळ्या असतात असं आपण बघतो. उदा. एखादा कार्यक्षम मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या कार्यकालामध्ये जे काम करतो ते दुसरा करेलच असे नाही. त्यामुळे एकाच्या कार्यकालात आणि दुसऱ्या अधिकाऱ्याच्या कार्यकालात विकासाच्या गतीमध्ये बराच फरक पडलेला असतो. त्यामुळे सर्व शासकीय खात्यामध्ये प्रशासनाची कुवत जिल्हा पातळीवर असणाऱ्या राजकीय नेतृत्त्वाची कार्यक्षमता, प्रगतीची आस्था या साऱ्यांचा फार मोठा वाटा असतो. अशी अनेक प्रकारची संदिग्धता आपण तूर्तास बाजूला ठेवू, दरवर्षी हा मागासलेपणा दूर करण्यासाठी एकूण किती खर्च करावा लागेल या सोप्या प्रश्नाकडे आपण वळू. दांडेकर समितीने या संदर्भात त्यावेळेला एक आकडा काढला. त्यावेळी त्यांनी असे सांगितलं की एकूण नियोजनाच्या खर्चाच्या ८५ टक्के खर्च हा मागासलेपणा दूर करण्यासाठी ठेवायचा आणि उर्वरित १५ टक्के खर्च सामान्य योजनांवर खर्च करायचा. तूर्तास हे सूत्र मान्य केलं तरी या सूत्रानुसार दरवर्षी जर निधीचे वितरण करायचं म्हटले तर जे तुलनेने मागासलेले आहेत. ते या समतोल पातळीवर येण्यासाठी किती वर्ष लागतील याचाही विचार करायला हवा कारण दरवर्षी उपलब्ध असणारी जी काही आपली वित्तीय साधनसामुग्री आहे त्या वित्तीय साधनसामुग्रीला काही झपाट्याने चमत्कारिक गती मिळू शकत नाही. केंद्र शासनाकडून येणारा योजनात्मक खर्च जरी फार गतीने वर जाणार असला किंवा तो केंद्रीय वित्त आयोगाकडून येणाऱ्या निधीत फार मोठी भर पडणार असली असं जरी तूर्तास मानलं तरी त्याच्या आधाराने आपण असं सांगू की, उदाहरणार्थ पुढच्या १० वर्षात समतोल विकास अशा सूत्राने एकेका निवेशासाठी लागणारा सरासरी वेळ किती आहे, याचा दांडेकर समितीने स्पष्ट विचार केलेला दिसून येत नाही. त्यामुळे जर हा निर्देशांक (Indicator) पुन्हा हिशोब करून बघितला तर जो कालावधी येईल तो कालावधी ६५ वर्षे असा येईल. या सूत्रानुसार एकेका निवेशासाठी ६५ वर्षे, ७० वर्षे, ७५ वर्षे इतका कालावधी जातो. आणि यांच्या ७५ वर्षानंतर काय शेवटी साधणार आहे हेही लक्षात घ्या. जो मागासलेला विभाग आहे तो आणखी ७५ वर्षानंतर आजच्या विकास साधलेल्या विकासाच्या समकक्ष येणार पण या कालावधीत आज तुलनेने विकास साधलेले अधिक पुढे जाणार त्यामुळे ७५ वर्षानंतर आपण समतोल विकास म्हणणार का? हा सर्वात कळीचा प्रश्न आहे. दांडेकर हे सर्वात मोठे

संख्याशास्त्रज्ञ होते. त्यांनी त्याबद्दल एकच शेरा मारलाय, तो म्हणजे, ''आर्थिक विकासातील जी तफावत आहे ही तफावत दूर करणे ही एका योजनेपुरती किंवा २-३ दशकांपुरती गोष्ट नाही तर ती अव्याहत चालणारी घटना आहे.'' (It is continuous process which will be continued for whatever time to pass) याचा अर्थ हा जो काही अनुशेष आहे, तो केव्हा पर्यंत चालू राहणार तर तो अनंत काळ चालू जरी राहिला तरी असं समजून विदर्भातल्या कोणाला जर कुणी सांगितलं की विकासाबाबत ६५ वर्षानंतर साधारणत: तुम्ही इथे येऊन ठेपाल तर हे कोणालाही मान्य होणार नाही. पण या सूत्रानुसार आम्हाला निधी द्या हे मात्र सर्वांना मान्य होईल. कारण समतोल विकास जरी साधला जाणार नसला तरी निधी मिळेल हे या ठिकाणी सर्वात जास्त महत्त्वाचं आहे. केळकर समितीचा अहवाल मान्य होईल की नाही माहिती नाही पण ही एकप्रकारची भविष्यातली घटना आहे. कारण या समितीच्या सूत्रानुसार ६५ वर्षांनंतर वा ७० वर्षानंतर घडणार आहे. हे पाहिजे का तुम्हाला? इतका साधा सरळ प्रश्न हा अहवाल विचारतो. ज्याचे सरळ तांत्रिक उत्तर आज कुणाकडे नाही. उत्तर विदर्भातही नाही. जोपर्यंत हे कळत नाही की दांडेकर समितीच्या सूत्रामध्ये काहीतरी गोंधळ आहे. याला जर चिकटून बसलो तर एकच गोष्ट होऊ शकते ती म्हणजे यावर अनेक राजकीय पिढ्या तगून राहतील इतकंच. इथे हेही लक्षात घेतलं पाहिजे की दांडेकर समितीच्या या सूत्रावर चिकटून राहण्याचा दोष फक्त राजकर्त्यांना देऊन भागणार नाही तर तेवढाच भुजंगराव समितीकडे पण हा दोष जातो. 'बॅकवर्ड इंडिकेटर समितीने' देखील हा प्रश्न लक्षात येऊनही तसाच ठेवला, असे लक्षात येते. दांडेकर समिती आणि त्या अगोदरच्या बव्हंशी समित्या या 'वित्तीय अनुशेषाला' चिकटून राहिल्या हा एक मोठा दोष या समित्यांमध्ये दिसून येतो. पण 'अनुशेष' हा शब्द इतका परवलीचा आणि रुढ झाला आहे की त्याच्या कक्षेबाहेर जाऊन अजून विस्तारित विचार करणे आणि मांडणे हे धार्जिणे नाही. या साऱ्याची समिक्षात्मक चर्चा संक्षेपात 'समतोल प्रादेशिक विकासाकडे : एक बहुआयामी धोरण दृष्टिकोन' या प्रकरणात केलेली आहे. आर्थिक निकषावरच तपासायचं झाले तर विदर्भ-मराठवाड्यातच नव्हे तर खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातही काही भाग हे विशेष मागासलेले दिसतात. पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेला आणि आदिवासी लोकसंख्येचे आधिक्य असलेला भाग विशेष मागास दिसतो. जिथे पाण्याचे सातत्याने चालणारे दुर्भिक्ष्य आहे. जिथे मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आहे तिथे मागासलेपणाचे जवळपास सर्व निर्देशांक हे निश्चित सापडतात.

उदा: जो विदर्भात नाहीपण तो मागासपणात सर्वात पुढे आहे तो नंदुरबार. त्यामुळे या केळकर समितीचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी पश्चिम महाराष्ट्रच नाही तर उर्वरित महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा याखेरीज काही विभाग काही गोष्टीत मागासलेले काल्पनिक विभाग घेतले आहेत. म्हणजे ज्याला भौगोलिक विभाग म्हणता येणार नाही पण जिथे मागासलेपणा फार दाटून राहिलाय असे विभाग जे आहेत त्यांचाही विचार केलाय. ही समिती विदर्भ, मराठवाड्यासारख्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांच्या मागासलेपणाचा, त्यांच्या कारणांचा व उपाययोजनांचा स्वतंत्र विचार करताना दिसते, तसेच विदर्भात, मराठवाड्यात भौगोलिकदृष्ट्या समाविष्ट नसलेले पण पाण्याचे दुर्भिक्ष्य किंवा आदिवासीबहुल असलेल्या विभागांच्या मागासलेपणाचाही अभ्यास केलेला दिसतो. त्यामुळे हा अहवाल फक्त विदर्भ व मराठवाड्यापुरता मर्यादित नाही तर तो मराठवाडा, विदर्भ आणि पाण्याचे दुर्भिक्ष्याने असलेले मागासपण आणि आदिवासीबहुल अशा चार वर्गाच्या मागासलेपणा बद्दल भाष्य करणारा आहे. आणि हेच या समितीचे वैशिष्ट्य

आणि बलस्थान आहे. हे करण्याचे एक कारण असे आहे की मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक मागासलेपणाचे कारण देखील पाण्याचं दुर्भिक्ष्य हे आहे. तसंच जवळपास उर्वरित महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यामध्ये उपलब्ध पाण्याच्या वापराची असणारी जी काही असमानता आहे ती एकूण राज्यापेक्षाही जास्त तीव्र आहे. उदा: सांगली जिल्हा, पुणे जिल्हा, पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुका जो बारामतीशी निगडीत आहे, तो पुरंदर तालुका अन्य तालुक्यापेक्षा पूर्ण वेगळा चेहरा असलेला तालुका आहे. कारण एकीकडे पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. तर इतरत्र पाण्याचा सुकाळ आहे. तसंच तासगांवचं. तसेच कवठेमहाकांळ मध्ये आहे. आर्थिक मागासलेपणाचं कारण हे मुख्य आर्थिक व्यवहार आणि त्यासाठी लागणाऱ्या साधनांची उपलब्धता यासोबतच पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि आदिवासीबहुल हे ही दोन निर्देशांक समितीने गृहित धरून शिफारशी केल्या आहेत. त्यामुळे या दृष्टीने केळकर समिती ही या आधीच्या प्रादेशिक अनुशेषावरल्या इतर समित्यांच्या तुलनेत वैशिष्ट्यपूर्ण ठरते. त्यामुळे या समितीचा अहवाल स्वच्छपणानं असं म्हणतो की दांडेकर समिती किंवा त्यांच्यानंतर आलेली, मागासपणाच्या निर्देशांकाची समिती यांचा जो काही दृष्टिकोन आहे, त्याच्या आधाराने हे जे काही वित्तीय वर्गीकरण आहे, हे मागासलेपणाच्या वर्णनासाठी उपयुक्त असलं तरी निराकरणासाठी उपयुक्त नाही हा या समितीचा मुख्य संदेश आहे. त्यामुळे दांडेकर समितीच्या निकषानुसार असणारे जे काही अनुशेष दूर करण्यासाठी म्हणून जी काही साधने आहेत ती साधनं फक्त सरकारी खर्च आणि त्याचे समानीकरण यांच्याभोवती एकवटलेली आहेत, यालाच चिकटून राहायचं म्हटले तरी एकूण विकासाची गती ही पुढच्या ६५ वर्षासाठी वगैरे अशी ठरवावी लागेल आणि हे या मागासवर्गीय भागांना तर मंजूर होणारच नाही, पण आर्थिकदृष्ट्या ते आवश्यक देखील नाही. त्यांना मंजूर होते की नाही याहीपेक्षा महत्त्वाचं असं की हे आर्थिकदृष्ट्या आवश्यक आहे की नाही. एकूण आर्थिक गती जिल्ह्याची किंवा विभागांची कशामुळे वाढते ? कशामुळे वाढू शकते ? कोणत्या क्षेत्रामध्ये अधिक वाढू शकते ? कोणत्या जिल्ह्यातल्या कोणत्या क्षेत्रामध्ये अधिक वाढू शकते ? असा विचार करून सरकारने आपला खर्च मोजला पाहिजे आणि त्यानुसार आर्थिक धोरण आखलं पाहिजे. एक महत्त्वाचा फरक केळकर समिती आणि त्याआधीच्या इतर समितीमधला आहे तो म्हणजे, आज अनेक गोष्टी या आपण हक्कात्मक स्वरुपाने राज्य सरकारांची जबाबदारी म्हणून मान्य केलेली आहे. उदा: सर्व शिक्षा अभियान. त्याच्यामध्ये समानीकरण असायला पाहिजे. उदाहरणार्थ, तुम्ही बीड मध्ये असाल नाहीतर अजून कुठे असाल, तुम्हाला अमूक इतकं प्राथमिक शिक्षण मिळालच पाहिजे. मग यासाठी तो विभाग मागासलेला आहे की नाही ? तालुका मागासलेला आहे की नाही ? असा निकष येतच नाही. हक्कात्मक स्वरुपात रुपांतरित झालेल्या अशा अनेक प्रकारच्या ज्या सुविधा आहेत, अशा सुविधांचा केळकर समितीने मुद्दामहून उल्लेख केला आहे. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षण समितीचे असं म्हणणं आहे की, एकूण महाराष्ट्राची अर्थव्यवस्थेची गती लक्षात घेता प्राथमिक शिक्षणावरती आम्हाला समाधान मानणं हे धोकादायक आहे. राज्यभर शिक्षण म्हणून जी काही जबाबदारी पत्करायची असेल ती प्राथमिक शिक्षणापुरती मर्यादित न ठेवता दहावीपर्यंत जवळपास सर्वांना शिक्षण देता येईल अशा प्रकारची धोरणं असावी. आता अशा हक्कात्मक जबाबदारीबाबत राज्यभर समानीकरण असले पाहिजे असे केळकर समिती म्हणते. त्यावर खर्च असायला पाहिजेच अशी सक्ती नाही. खर्च करू नये असेही केळकर समितीचे म्हणणे नाही. कारण खर्च कसा, किती, कुठल्या प्रकारच्या क्षेत्रामध्ये राज्य शासनाने जास्त हिरीरीने करावा हे त्या त्या राज्य सरकारनं राजकीयदृष्ट्या द्यायचा आणि काही

प्रमाणात आर्थिकदृष्ट्या द्यायचा हा त्यांचा निर्णय आहे. उदा : रस्ते झाले आणि छोटी शहरे विकसित झाली की, ज्या प्रकारचं स्थलांतरण होतं या स्थलातंरणामुळे ज्या प्रकारच्या सोयी-सुविधा पुरवायच्या असतात त्या राज्य सरकारच्या विकासात्मक-हक्कात्मक जबाबदारी म्हणून पत्करता त्याचं स्वरुप बदलतं. म्हणून त्याच्याबद्दल शासनानं असंच करावं असं करू नये, असा आग्रह नाही.

प्रकरण ४ थे, 'समतोल प्रादेशिक विकासाकडे' हे प्रकरण सर्वात महत्त्वाचे आहे कारण यात समतोल विकासाचे निर्देशांक (Indicators) सापडतील. याच प्रकरणातील ४.११ या विभागात एक दृष्टिकोन स्वतंत्रपणे मांडलाय. जो एक दृष्टीने विकासाचा निर्देशकही आहे तो म्हणजे नागरीकरण. महाराष्ट्राच्या दृष्टीने नागरीकरण जी फार वेगळ्या प्रकारची दर्जाची समस्या आहे आणि ती जशी विकसित भागामध्ये वाढते ती तशीच अविकसित भागामध्येही नागरीकरण झपाट्याने वाढते आहे. त्यामुळे नागरीकरणामुळे ज्या काही वेगळ्या प्रकारच्या समस्या उद्भवणार आहेत. त्यावर प्रकाशझोत टाकणारे हे प्रकरण आहे. 'नागरी क्षेत्र' (Urban Region) यामध्ये वेगळा प्रकारचा प्रश्न आहे. यात वेगळा प्रकारचा आर्थिक मागास विभाग अंतर्भूत आहे. प्रत्येक नागरी क्षेत्रामध्ये त्याचं निराकरण हे पूर्णत; करता येईल का, त्याला वेगळे क्षेत्र म्हणून हाताळता येत नाही. जसं पाणी आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्या मुळे असणारे मागासलेपण हे स्वतंत्र क्षेत्र म्हणून हाताळता येतात. आदिवासी हा एक स्वतंत्र लोकसंख्या विभाग म्हणून जसा हाताळता येतो, तसा नागरी क्षेत्र स्वतंत्रपणे हाताळणे शक्य नाही. हा मुद्दा सर्वात महत्वाचा आहे तो कदाचित पुढच्या काही काळामध्ये होईल. दांडेकर समितीच्या संदर्भामध्ये जे टीकात्मक विवेचन आहे ते प्रकरण ४:१ 'प्रादेशिक असमतोलासंबंधी धोरण एक मागोवा' आणि ४: २ 'सत्यशोधन समिती आणि निर्देशांक व अनुशेष समिती - एक संक्षिप्त आढावा' या प्रकरणामध्ये सापडते. दांडेकर समितीच्या अहवालातील त्रुटींचा इथे स्वतंत्र उल्लेख या प्रकरणात आढळतो. दांडेकर समितीची परंपरा मोठ्या प्रमाणात 'बॅकवर्डनेस इंडिकेटर कमिटीने' केलेली असल्यामुळे, त्यांनी वापरलेले जे निर्देशांक (Indicators) होते त्याच्या आधारावर असलेली म्हणून जी समीक्षा आहे ती प्रकरण ४.२ मध्ये येते. या अहवालाच्या पृष्ठ क्र. १२ वर असमतोल कमी करण्याबाबतचे धोरण मांडले आहे. ज्यात योजनानिहाय आढावा घेतला आहे. यात मार्ग-१ (Track 1) आणि मार्ग-२(Track 2) विशद केले आहेत. या आकृतीमध्ये लोकोपयोगी वस्तुवार (Public Goods) विशेषत्वाने समावेश केला आहे. यात १०वीपर्यंतचे शिक्षण, घरगुती वीज जोडणी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, न्याय आणि कायदा सुव्यवस्था व सामाजिक सुरक्षा, सार्वत्रिक आरोग्य सुविधा, बारमाही रस्ते या प्रमुख लोकापयोगी वस्तू (Public Goods) यातली समान संधी अपेक्षिली आहे (आकृती ४.१) आणि यांना उद्देशून समितीने म्हटले आहे की, ``they need to be eighter mandatory or as a development responsibility to be provided with the help of the state." अशा महत्त्वाच्या लोकोपयोगी वस्तूंच्या विकासाचा विचार कसा करावा ते मार्ग -२ (Trade 2) मध्ये दिलेले आहेत. हा एका अर्थानं समितीच्या दृष्टिकोनाचा सारांश म्हणता येईल. अहवालातील पृष्ठ क्र. १२० वरील चौकोन ४:१ मध्ये पाण्याबद्दलचा दोन मार्गी दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. यात पाण्याचा शेतीत जो वापर होतो उद्योगात वापर होतो त्या वापराचा विचार वेगळ्या पातळीवर, वेगळ्या धारणेवरती आणि निकषावरती करावा लागतो. तर तो कसा करावा याबद्दलचे जी काही मानकं आहेत. त्याचा परामर्श घेतला आहे. पाण्याचा आर्थिक संसाधन म्हणून

विचार करणं व विकासात्मक गरज म्हणून विचार करणं या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत त्या कशा हाताळायला पाहिजेत याच्याबद्दलच सांगणारा हा चौकोन ४.१ आहे .

प्रादेशिक असमतोल कमी करण्याबाबतचे केळकर समितीने सुचविलेले धोरण



प्रत्येक क्षेत्रामध्ये वापरताना काय काय करावे लागते यांचे निर्देशांक काढण्याची माहिती देणारा चौकोन ४.१ वाचला तर समितीच्या अहवालाच्या मतितार्थाचे सारांशाने आकलन होते. महामंडळाबाबत बोलायचं तर महामंडळे फक्त नेमायची मात्र त्यांना प्रत्यक्षात अधिकार द्यायचे नाहीत. सरकारची जी काही प्रशासकीय यंत्रणा आहे ती त्याच्या अखत्यारीतच नाही. जे त्यांना काहीच देऊ शकत नाहीत, आदेश देऊ शकत नाही आणि त्यांना विचारणा सुद्धा करू शकत नाहीत, माहिती मागवू शकत नाही अशी निष्प्रभ महामंडळे कोणता विकास साधणार ? महामंडळाला शासनाच्या विविध विभागाकडून माहिती मागवायची असल्यास राज्यपाल महोदयांना पत्रावर पत्र धाडावी लागतात, तरीही माहिती मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. विकास महामंडळांच्या या प्रभावहीन कामकाजावर तोडगा काय असू शकतो ? त्यांच्यामध्ये विशेषत: प्रशासकीयदृष्ट्या काय शक्य होऊ शकते ? याचा विचार करून समितीने सुचविलेल्या गोष्टी आहेत. या मुख्यत: प्रकरण ६ सुशासन : महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण व उत्तरदायित्वे (Governance: Towards Greater Regional Empowerment and Accountability) या प्रकरणात वाचावयास मिळतात. यामध्ये समितीने नाविन्यपूर्ण नमुना सुचविलेला आहे की, ज्या नमुन्यानुसार ही प्रक्रिया राज्यपालांच्या कार्यालयामध्ये जात नाही ती सरकारमध्येच राहते. मुख्यमंत्र्यांच्या किंवा मुख्यमंत्र्यांनी नेमलेल्या त्या विभागातल्या सर्वात ज्येष्ठ मंत्र्याकडे राहते. अशाप्रकारची सुचवलेली ही योजना आहे की जेणेकरून नियोजनाची एक फांदी राज्यपालाच्या अखत्यारित, दुसरी सरकारच्या म्हणजेच विभागाच्या पध्दतीने चालते तशी चालू द्यायची. अशा प्रकारचे राजकीय उत्तरदायित्व कायम ठेवलेले आहे. विधानमंडळाचे सदस्य पण त्याला उत्तरदायी राहतील अशा प्रकारची ही योजना आहे. ही योजना देखील एकूण समितीच्या शिफारशीच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची आहे. दुसरा भाग असा की समितीने मार्ग-१ (Track-1) म्हणजे राज्य शासनाची घटनात्मकदृष्ट्या स्वत: किंवा आर्थिक विकासात्मक धोरण म्हणून स्वत:ची पत्करण्याची जबाबदारी, ती स्वीकारून आर्थिक विकासाला चालना मिळण्यासाठी म्हणून खर्च करायची जबाबदारी, आणि या अनुषंगाने त्यासाठी लागणारी जी साधनसामग्री आहे ती उपलब्ध होऊ शकते का ? या प्रश्नांचा विचार दांडेकर समितीने कधीच स्पष्ट केला नाही. परंतु तशाच प्रकारची चूक पुन्हा घडू नये आणि ज्या प्रकारे त्यात विकासातल्या विविध क्षेत्रांना गती देणाऱ्या 'क्षेत्र विशेष योजना' (Sector Specific Plans) आहेत. हेच या समितीचे प्रथम वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

असे अनेक विभागीय समतोलाचे प्रश्न आहेत ज्यांच्यामध्ये केंद्रसरकारचा वित्तीय वाटा असणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे मिळणाऱ्या काही विशिष्ट महसुलाचा वाटा देखील विभागीयदृष्ट्या निश्चित होणे हे गरजेचे आहे उदाहरणार्थ, राज्य सरकारला कोळसा खाणी वर जी केंद्र सरकारकडून स्वामीत्व धन मिळते त्या स्वामित्त्व धनातून राज्याला हिस्सा मिळतो आता तो हिस्सा महाराष्ट्राला जेव्हा मिळतो तेव्हा तो विदर्भात जात नाही वास्तविक पाहता संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता हा हिस्सा संपूर्ण महाराष्ट्राला मिळतो मात्र उर्वरित महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या खाणी नाहीत पण तो मिळतो सगळ्या महाराष्ट्राला. तो राज्याच्या एकत्रित निधीमध्ये (Consolidated fund) जातो. पण तसे न करता तो विदर्भासाठी राखता आला पाहिजे. म्हणजेच थोडक्यात अशाप्रकारचे जे उत्पन्न आहेत ज्यांना प्रादेशिक वैशिष्ट्ये आहेत किंवा त्याला त्याप्रकारचे प्रादेशिक बिरुद आहेत. अशाप्रकारचा महसूल हा त्या विभागासाठीच खर्च व्हायला पाहिजे. आणि कोळसा ही विदर्भामधली अत्यंत संवेदनशील

बाब आहे. विदर्भातल्या लोकाना स्वतंत्र होण्याचं एक उत्तर म्हणजे कोळसा आहे. परंतु कोळसा जाळून तयार झालेल्या विजेतून उत्तर महाराष्ट्रामध्ये व पश्चिम महाराष्ट्रामध्ये उद्योग चालतात. त्यामुळे खर्चामध्ये मिळणारा वाटा देखील त्या विभागासाठी राखला गेला पाहिजे. यात तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत एक म्हणजे वीज व दुसरा कोळसा व त्याच्यावरचे स्वामित्त्व धन तसेच तिसरे म्हणजे महराष्ट्र सरकारला जंगल राखण्याचा म्हणून जो निधी केंद्र सरकारकडून मिळतो तो देखील जंगलाच्या प्रमाणात त्या त्या विभागाकडे जायला पाहिजे असा निधी भौगोलिक विशेषत: पाहिल्यास मराठवाड्याला फारसा मिळू शकत नाही पण विदर्भाला फार मोठ्या प्रमाणात मिळू शकतो. या सगळ्याचा तपशीलवार विचार या अहवालामध्ये पूर्णत: केलेला आहे. कारण या अहवालाची आखणी करताना विशेषत: लोकांकडून आलेल्या तक्रारी आणि अपेक्षा याची, आर्थिकदृष्ट्या विशेषत: प्रशासकीयदृष्ट्या छाननी करून शिफारशी केलेल्या आहेत. योजनाखर्चातील साधारणत: २३ टक्के वाटा हा पाण्यावरती जातो. हे २३ टक्के सुध्दा कशाचे ? आपण पहिल्यांदा ९.४ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जमातींसाठी आणि अनुसूचित जातींसाठी ११.८ टक्के अनुसूचित जातीसाठी वेगळे काढून मग उरलेला जो राहतो त्याच्यातला २३ टक्के. मुख्यत: पाणी ही सर्वात मोठी क्लिष्ट गोष्ट आहे. मात्र समितीने जलसंपत्तीचा विकास या १०व्या प्रकरणात याचे विस्ताराने विवेचन केले आहे. मराठवाड्याच्या प्रगतीसाठी पाणी हे देखील पुरेसे उत्तर असू शकत नाही. विदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचे म्हणजे एक रस्ते व दुसरे रेल्वे असे आहे. मराठवाड्याचे दळवळणाचे संपर्क जाळे (Connectivity), उर्वरित महाराष्ट्राचे असणारे संपर्क जाळे (Connectivity), अन्य राज्यांशी जर वाढली तरच मराठवाड्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारचे प्रक्रिया उद्योग उभे करता येतील. त्यामध्ये केंद्र सरकार एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे केंद्राच्या अखत्यारितील मुख्यत: लष्करी साधनसामग्रीशी असणारे कारखानदारी उद्योगांमुळे मराठवाड्यालाा चालना मिळू शकते. मात्र हे येण्यासाठी दोन गोष्टी लागतील एक रस्ते आणि दुसरे म्हणजे रेल्वे मार्ग. मराठवाड्याच्या दृष्टीने रस्ते आणि रेल्वेला अतोनात महत्त्व आहे. कारण हा विभाग व्यापारी व आर्थिकदृष्ट्या भारताच्या इतर विभागापासून तुटलेला राहतो. वाहतूक हेच दुखणं कोकणचे पण आहे. तुलनेनं खानदेश हा व्यापारी मार्गावर आहे. कोकणाला फक्त किनारपट्टीला जाणारे रस्ते आणि जेवढी काही बंदरातील वाहतूक वगळता कोकण हा महाराष्ट्रापासून वेगळा राहिलेला आहे. हीच जर पूर्व-पश्चिम संपर्क जाळे (Connectivity) वाढली तर कोकणात होणाऱ्या उत्पादनाला फार मोठी चालना मिळेल. आपण सहसा पायाभूत सुविधांचा विचार करताना रस्त्याचा विचार करतो. नंतर रेल्वेचा करतो, सर्वात शेवटी बंदरांचा विचार करतो. महाराष्ट्रामध्ये ७२० किलोमीटरमध्ये ४७ बंदरे आहेत. बंदरांचा विकास कोकणाचा फार मोठ्या प्रमाणावर कायापालट करू शकतो, कोकणाचा विकास व्हायचा असेल तर कोकणाची सध्या भूपृष्ठावर असलेले संपर्क जाळे (Connectivity) मुंबई - गोवा असलेला कोकण रेल्वे मार्ग एवढीच राहिली तर कोकण कधीच पुढे जाऊ शकणार नाही. त्यामुळे कोकणाची पूर्व-पश्चिम संपर्क जाळे (Connectivity), वाढले तर कोकणाचा विकास होईल आणि हीच पूर्व-पश्चिम संपर्क जाळे (Connectivity), जे नंतर मराठवाड्यापर्यंत, सोलापूर पर्यंत जाते. ते जर वाढले तर या आर्थिक व्यवहाराला फार मोठी गती प्राप्त होऊ शकते. कोकण रेल्वे येऊनही कोकणात फार मोठ्या प्रमाणात मालवाहतूक नावाची गोष्ट नाही. माल वाहतूक वाढल्याशिवाय आर्थिक उलाढाल वाढत नाही. ती वाढविण्याच्या दृष्टीने पूर्व-पश्चिम जोडणारे रस्ते हे कोकण व मराठवाडा दोघांच्या दृष्टीने महत्त्वाचे

आहेत. मराठवाड्यामध्ये पाणी टंचाईचा प्रश्न आहे. उदाहरणार्थ: जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये वाहणाऱ्या नद्यांना जिल्हे किंवा जिल्ह्याच्या सीमा कळत नाहीत. त्यामुळे एका पात्रातले पाणी उचलून दुसऱ्या पात्रात टाकून पाण्याच्या दुर्भिक्ष्यावर मात करणं हे देखील अमरावती आणि मराठवाडा या दोन्ही विभागांची गरज आहे. ती जर पूर्ण झाली नाही तर हे जे पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे ते हाताळता येणार नाही.

कोकण, पाण्याच्या दृष्टीने समृध्द मानला जातो पण ते पूर्णत: चुकीचे आहे. कारण तो पावसाच्या दृष्टीने समृद्ध आहे पण साठविण्याच्या दृष्टीने समृद्ध नाही. कोकणामध्ये पाणी साठवता येत नाही. कोकणामध्ये दोन प्रकारच्या समस्येची सांगड घालायला लागते. पाणी जेव्हा येते तेव्हा कोकणात पूर येतात. पूर नियंत्रक बंधारे आणि त्याच नियंत्रक बंधाऱ्यातील साठवून ठेवलेले पाणी अनेक तालुक्यामध्ये जास्त काळ जवळपास मार्चपर्यंत पुरेल इतके पाणी साठविता येते. १) पूर नियंत्रण, २) साठलेल्या बंधारातल्या पाण्याच्या आधारावर लोकल वीज निर्मिती आणि ३) साठलेल्या बंधाराच्या आधारावर उशीराच्या म्हणजे रब्बीनंतरच्या दिवसामध्ये उपलब्ध होणारं पाणी या तिन्ही गोष्टींचा विचार करून लिहिलेल्या पेंडसे अहवालाने कोकणाच्या पाणी पुरवठ्याबाबत पूर्ण वेगळा विचार केलेला आहे तो विचार अंमलात येण्यासाठी आजपर्यंत काहीही केलेले नाही. चिपळूणच्या जोगळेकर नावाच्या गृहस्थांचे पेंडसे अहवालाच्या निर्मितीमागे महत्त्वाचे योगदान राहिले. मात्र दुर्दैवाने कोकणातल्या कोणत्याही लोकप्रतिनिधीने या अहवालाबद्दल आग्रही भूमिका घेतल्याचे दिसलेले नाही.

जलसंपत्ती विकासासाठी 'पाणलोट क्षेत्र विकास' यांच्यावरती भर असावा असं जवळपास अनेक लोक म्हणतात. एखाद्या ठिकाणी खड्डा करून पाणी साठविणे म्हणजे 'पाणलोट क्षेत्र विकास' अशा प्रकारचा विचार करून सुटणारी ही गोष्ट नाही. 'पाणलोट क्षेत्र विकास'च्या अंमलबजावणीसाठी काही हजार हेक्टरचा अभ्यास करून अशा मोठ्या जागांमध्ये ते केले पाहिजे व त्याचा वापर हा प्रकल्पांसाठी केला पाहिजे जेणे करून ही संकल्पना यशस्वी होईल. त्यामुळे 'पाणलोट क्षेत्र विकास' समजतात तशी सहज सोपी संकल्पना नाही. काही लोक मागणी करतात कारण त्यांच्याकडे त्यांचे काम नमुनेदार आहे असे वाटतं. परंतु शासनाने असे करणे योग्य नाही. यामुळे 'पाणलोट क्षेत्र विकास'च्या अपयशाचं प्रमाण वाढतं आणि ती शक्य असणारी गोष्ट विनाकारण बदनाम होते.

'गावतळे योजना' ही अशी आहे की तुम्ही खड्डा खणा ४० हजार घ्या, ८२ हजार घ्या, तिथं पाणी साठवा, प्लॅस्टिक आच्छादन करा असे करण्यासारखी ही योजना नाही. ती यशस्वी होत नाही म्हणून याच्याबद्दल काळजी घेतली पाहिजे. तरतूद भरपूर आहे २५ हजार रुपये दर हेक्टर. या २५ हजाराचे ३५ हजार होतील. पुढच्या दोन वर्षात ते मंजूरही होतील. परंतु याबाबतची संस्थात्मक अडचण जी आहे त्या अडचणीवर अजूनही विभागाला उपाय सापडलेला नाही. त्याचं एक कारण असं आहे की, भूगर्भजल तपासणी यासाठी म्हणून जो विभागाचा स्वतंत्र विभाग आहे, त्यांच्याकडं मनुष्यबळ कमी आहे. मोठे प्रकल्प करणारा हा विभाग आहे. तसेच या प्रकारच्या अभ्यासासाठी लागणारी यंत्रणा ही त्यांच्याही तुलनेने कमी आहे. त्यांच्याकडे माहिती आहे. परंतु या सर्वांचं आता पुनर्नियोजन करायचं तर त्याच्यासाठी लागणारं जे प्रशिक्षित मनुष्यबळ हवं, तितकं प्रशिक्षित मनुष्यबळ त्या विभागाकडे नाही. हा या मधला महत्त्वाचा त्रुटीचा भाग आहे. त्या सगळ्या मधून तुमच्या असं लक्षात येईल की, शासनाची प्रशासकीय क्षमता आणि

शक्यता याचा सातत्याने विचार समितीने केला आहे. कारण एरवी हे कागदावरती आकडे मांडून असं करणे शक्य आहे. अशा प्रकारचे जे नियोजनाचे स्वरुप आहे ते नियोजनाचे स्वरुप हे फार झपाट्याने बददले पाहिजे कारण ही सर्व कामे कोण करणार आहे? त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी लागतील? म्हणजे एवढा प्रकल्प हाती घेतल्यानंतर प्रत्येक टप्पा पूर्ण व्हायला किती कालावधी लागतो, एकूण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती काळ लागतो? त्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ किती आहे? प्रत्येक ठिकाणचे प्रश्न वेगळे आहेत, प्रश्नांचे स्वरुप वेगळं आहे हे प्रश्न अधिक गांभीर्याने स्वयंसेवी संस्थांनी घेणे गरजेचे आहे. याच्याबद्दल प्रात्यक्षिक करण्यासाठी लागणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्या तपशिलाचा अभ्यास करणे गरजेचे आहे, तसेच स्वत:च्या यशस्वी प्रकल्पाबद्दल देखील पारदर्शीपणाने पुरेसे राष्ट्रीयीकरण करत नाहीत. या दृष्टिकोनामध्ये म्हटलंय म्हणून सगळ्यांसाठी म्हणून ही एक जादूची कांडी अशाप्रकारचें या समितीने केलेल्या शिफारशींचं स्वरुप नाही. असंच उद्योगाबद्दल आहे, असंच संपर्क जाळ्यांबद्दल (Connectivity) आहे, असंच विजेबद्दल आहे, याआधी मी नमूद केलंय त्याप्रमाणे नागरीकरणाचा मुद्दा फार मोठ्या प्रमाणात विस्तारलेला नाही. पाणी पुरवठा प्रत्येकी १४० लीटर द्यावा असं जर म्हटलं तर कोणाला किती पाणी दिले याचा हिशेब आज देखील नगरपालिकांकडे नाही हा सर्वात कठीण भाग आहे.

पाणी पुरवठ्याबद्दल असणारे स्त्रोत, त्याची उपलब्धता आणि ते वाटण्याची सोय याच्याबद्दल असणारी जी काही सांख्यिकी व्यवस्था आहे ती नगरपालिका, महानगरपालिकांकडे अद्ययावत नाही हे लाजिरवाणे आहे. दुसरी अशीच पाण्याची संबंधित महत्त्वाची गोष्ट आहे ती म्हणजे 'प्रदूषण नियंत्रण मंडळ' (Polution Control Board). फार मोठ्या प्रमाणात पाण्याचा अधिकार आहे. पाण्याबाबत समितीची एक शिफारस अशी आहे की, प्रत्येक उद्योगाला ती आपल्याकडे वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या पुनर्वापरावर पूर्णत: सक्ती केली पाहिजे. जसं समितीच्या अहवालामध्ये हे तत्वं म्हणून नमूद झालंय. ऊसाची पूर्ण लागवड ही १०० टक्के सूक्ष्म सिंचनावर आधारित करून ती ठिबक सिंचनासह करावी आणि पूर्णत: सरकारी सबसिडीवर चालवू नये. ऊसाच्या मुख्यत: कारखान्यांना गेली ४५ वर्षे लागू असणारा विक्री कर जो खरेदी कर म्हणून गोळा केला जातो, तो कधीच शासनाला भरला जात नाही. त्याला दरवर्षी माफी मिळते. तो ४ टक्के असतो एवढी रक्कम जरी त्यांनी 'ठिबक सिंचन विकासासाठी' वापरली तरी फार झपाट्याने शेतकरी ती पत्करतील, कारण आता जरी शेतकऱ्यांना पाटानं पाणी देणं सहज वाटत असले, तरी त्यामध्ये पाण्याच्या उपलब्धतेची शाश्वती नाही. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होतो. तेव्हा पाणी सोडणारा 'पाटकर' हा सर्वात श्रीमंत असतो. केव्हा पाणी सोडायचे हे त्याच्या मर्जीवर अवलंबून असते. पाणी सुटेल त्यावेळेला वीज असते की नाही हे शेतकऱ्याला माहिती नसते त्यामुळे सोडलेले पाणी भरून घेणे, ही जी वृत्ती तयार झाली ती भरून घेणं ती निदान टाक्यात भरून ठेवणे इथंपर्यंत जरी आली, तरीसुद्धा पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल. याचा एक दूरगामी परिणाम असा की, त्याच भागामध्ये उपलब्ध असणारी पाण्याची मात्रा वाढेल. त्यामुळे पाणी अन्यत्र दुसऱ्या पिकासाठी म्हणून वापरता येईल. १९७८ साली नेमण्यात आलेली दांडेकर, देशमुख आणि देऊसकर समिती जी 'देदाद समिती' म्हणून प्रसिद्ध होती. या समितीची पाण्याबाबत जी शिफारस होती ती शिफारस केळकर समितीमध्ये देखील आहे. कारण एका पिकाची शाश्वतता येईल असं पाणी कोणत्या ना कोणत्या तत्त्वावरती मोजून देऊ. काही भागामध्ये दरडोई, काही भागामध्ये दर हेक्टरी पाण्याच्या उपलब्धतेनुसार बदलावे लागेल. पाणी असे मोजून द्यावं लागेल. शेतकऱ्याला

किमान एका पिकाची शाश्वती देता आली पाहिजे, अशा रितीने पाण्याचे नियोजन आणि वापर असला पाहिजे. ही सुद्धा यामधली शिफारस आहे. उद्योजकांनी आपल्या सर्व पाण्याचा पुनर्वापर करावा, कारण यामध्ये किती पाणी वाया जाते, किती पाणी दूषित होऊन सोडले जाते. त्यामुळे पाणी पुरविण्याचा प्रश्न हा अत्यंत डोकेदुखीचा विषय आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी सर्वात जबाबदार अधिकारी वर्ग कुठला तर 'प्रदूषण नियंत्रण मंडळ'. परंतु आजही चांगली भरवशाची, नियोजनाला वापरता येईल अशा दर्जाची आकडेवारी आज या मंडळाकडे उपलब्ध नाही, असं म्हटलं जातं की राजकीय नियंत्रणा खालोखाल 'प्रदूषण नियंत्रण मंडळाचे' नियंत्रण असते. त्यामुळे या अहवालाचं स्वरुप म्हणजे आखणी अशी आहे की, पहिल्यांदा लोकांना कशामुळे आपण मागास आहोत असे वाटते ? त्याचं राजकीय स्वरुप काय आहे ? त्यामागच्या इच्छा, आकांक्षा काय आहेत ? दुसरं मागासलेपणाला सर्वंकष आर्थिक पैलू, आर्थिक मागासलेपणा म्हणजे काय ते तपासणे असे हे स्वरुप आहे. त्यानंतर हा मागासलेपणा हाताळण्यासाठी आजवर धोरणात्मक प्रयत्न काय झाले याबद्दल विचार केला गेला आहे. विकासाच्या असमतोलाबाबतची चर्चा देखील यात आहे. 'गव्हर्नन्स' किंवा सुशासनाबाबत तपशीलवार चर्चा केली आहे. अशी या अहवालाची आखणी केली गेली आहे. एकदा का त्याचा गाभा लक्षात आला की, अहवालाचे निष्कर्ष व शिफारशी समजणे सोपे जाईल.

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, प्रशासनिक गुणवत्तेशी आणि नेतृत्वाशी संबंधित संस्थात्मक असे अनेक घटक प्रादेशिक विषमतेवर महत्त्वाचा प्रभाव पाडीत आहेत. - केळकर समिती

आमचा विश्वास आहे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सबलीकरण हेच कळीचे मुद्दे असून ते आम्ही शिक्षण आणि प्रशासन या संबंधी (खास करून विकेंद्रीकरणात) केलेल्या शिफारशींच्या माध्यमातून साध्य होऊ शकतात. - केळकर समिती

आम्हाला असे आढळून आले आहे की, याकरिता कोणतीही जलद उपाययोजना नाही. आणि सामाजिक व राजकीय नेतृत्वाच्या एक विचाराने प्रयत्नासह कुशल मनुष्य बळाचा वापर हेच यावरील उत्तर आहे. - केळकर समिती

केळकर समितीने सुचविलेली वार्षिक नियतवाटपाची पद्धती (भाग -१)

(रूपये कोटीत)

भाग–एक							
राज्य योजना आकार (व्यक्त)			A	६५०००	(टक्केवारीशिवाय पूर्णांकात दर्शविलेले आकडे)		
अनुसूचित जाती उपयोजना	१०.२	A ची टक्केवारी	B	६६३०	विद्यमान टक्केवारी नुसार		
जनजाति उपयोजना	८.९	A ची टक्केवारी	C	५७८५	विद्यमान टक्केवारी नुसार		
राज्य सर्वसाधारण योजना (अनसूचित जाती उपयोजना व जनजाती उपयोजनेनंतर)		A-(B+C)	D	५२५८५			
एकूण जल क्षेत्र योजना (प्राथम्य नियतवाटप)	३०	D ची टक्केवारी	E	१५७७६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
राज्य सर्वसाधारण योजना (अ.जा./उपयोजना/जनजाती उपयोजनाजल नंतर)		(D-E)	F	३६८१०	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
विभाज्य राज्य सर्वसाधारण योजना	६०	F ची टक्केवारी	G	२२०८६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
अविभाज्य राज्य सर्वसाधारण योजना		(F-G)	H	१४७२४			
जिल्हा नियोजन समित्या व तालुक्यांसाठी स्थानिक स्तर							
राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्यांना नियतवाटप	३०	G ची टक्केवारी	I	६६२६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
राज्यातील सर्व तालुक्यांना नियतवाटप	३०	G ची टक्केवारी	J	६६२६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
शिल्लक विभाज्य प्रादेशिक योजना		G-(I+J)	K	८८३४			
क्षेत्रवार स्थानिकस्तर (एल ते पी)							
संपर्क जाळे (रस्ते, रेल, जल व हवाई मार्ग)	२०	G ची टक्केवारी	L	४४१७	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
कृषि व संलग्न (कृषि, पशुसंवर्धन दुधव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय आणि सहकार)	१५	G ची टक्केवारी	M	३३१३	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
ऊर्जा	८	G ची टक्केवारी	N	१७६७	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
सार्वजनिक आरोग्य	११	G ची टक्केवारी	O	२४२९	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
शिक्षण (प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय)	११	G ची टक्केवारी	P	२४२९	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निर्धारित प्रमाणात		
विभाज्य राज्य सर्वसाधारण योजना (उर्वरित)		G-(L:P)	Q	७७३०			
प्रादेशिक (इतर क्षेत्रीय योजना)	**स्थलीयसंबंधी नियतवाटप**			**विदर्भ**	**मराठवाडा**	**उर्वरित महाराष्ट्र**	
प्रादेशिक (इतर क्षेत्र) योजनांतर्गत नियतवाटप (टक्केवारी)			R	१००	३०.७८%	२८.५१%	४०.७१%
प्रादेशिक जिल्हा नियोजन समित्यांना नियतवाटप		I पैकी	I	६६२६	२०३९	१८८९	२६९७
प्रादेशिक तालुक्यांना नियतवाटप		J पैकी	J	६६२६	२०३९	१८८९	२६९७
शिल्लक विभाज्य प्रादेशिक योजना		K पैकी	K	८८३४	२७१९	२५१९	३५९६
एकूण प्रादेशिक (इतर क्षेत्र) नियतवाटप			G	२२०८६	६७९७	६२९७	८९९१
प्रादेशिक (इतर क्षेत्रीय) योजना	**क्षेत्रिय नियतवाटप**			**विदर्भ**	**मराठवाडा**	**उर्वरित महाराष्ट्र**	
वाहतूक मार्गांचे जाळे (रस्ते, रेल्वे, जल व हवाई मार्ग)			L	४४१७	१३५९	१२५९	१७९८
कृषि व संलग्न (कृषि, पशुसंवर्धन दुधव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय आणि सहकार)			M	३३१३	१०२०	९४५	१३४९
वीज			N	१७६७	५४४	५०४	७१९
सार्वजनिक आरोग्य			O	२४२९	७४८	६९३	९८९
शिक्षण (प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय)			P	२४२९	७४८	६९३	९८९
विभाज्य राज्य सर्वसाधारण योजना (उर्वरित)			Q	७७३०	२३७९	२२०४	३१४७
एकूण प्रादेशिक (इतर क्षेत्रीय) नियतवाटप			**G**	**२२०८६**	**६७९७**	**६२९७**	**८९९१**

केळकर समितीने सुचविलेली वार्षिक नियतवाटपाची पद्धती (भाग -२)

(रुपये कोटीत)

भाग दोन							
राज्य योजना आकार (व्यक्त)			A	६५०००	(टक्केवारीशिवाय पूर्णांकात दर्शविलेले आकडे)		
अनुसूचित जाती उपयोजना	१०.२	A ची टक्केवारी	B	६६३०	विद्यमान टक्केवारी नुसार		
जनजाति उपयोजना	८.९	A ची टक्केवारी	C	५७८५	विद्यमान टक्केवारी नुसार		
राज्य सर्वसाधारण योजना (अनुसूचित जाती उपयोजना व जनजाति उपयोजनेनंतर)	A-(B+C)		D	५२५८५			
एकूण जल क्षेत्र योजना (प्राथम्य नियतवाटप)	३०	D ची टक्केवारी	E	१५७७६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
विशेष क्षेत्राला नियतवाटप (इ. पैकी)	८.५	E ची टक्केवारी	R1	१३४१	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
(अ) पाण्याचे प्रमाण कमी असणाऱ्या तालुक्यांसाठी	२७.३	R१ ची टक्केवारी	S	३६६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
(ब) भूस्तर प्रतिकूल तालुक्यांसाठी	२६.३	R१ ची टक्केवारी	T	३५३	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
(क) खार-पाण-पट्टा साठी	८.२	R१ ची टक्केवारी	U	११०	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
(ड) भूतपूर्व मालगुजारीसाठी (मिलीमिटर)	३८.२	R१ ची टक्केवारी	V	५१२	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
जल क्षेत्र (उर्वरित नियतवाटप)	E-(S:V)		W	१४४३५	संपूर्ण जलक्षेत्रासाठी		
राज्य सर्वसाधारण योजना (अनुसूचित जाती उपयोजना/जनजाति उपयोजना/जल नंतर)	(D-E)		F	३६८१०			
विभाज्य राज्य सर्वसाधारण योजना	६०	F ची टक्केवारी	G	२२०८६	नियतवाटपाच्या सुचविलेल्या निश्चितप्रमाणात		
अविभाज्य राज्य सर्वसाधारण योजना	(F-G)		H	१४७२४			
भाग तीन							
स्थलीय (जल क्षेत्र योजना) नियतवाटप					**विदर्भ**	**मराठवाडा**	**उर्वरित महाराष्ट्र**
(अ) पाण्याचे प्रमाण जास्त असणाऱ्या तालुक्यांसाठी	S पैकी		S	३६६	२५	१०८	२३३
(ब) भूस्तर प्रतिकूल तालुक्यांसाठी	T पैकी		T	३५३	५०	६२	२४१
(क) खार-पाण-पट्टा साठी	U पैकी		U	११०	११०		
(ड) भूतपूर्व मालगुजारी तलावासाठी (मिलीमिटर)	V पैकी		V	५१२	५१२		
पुढे दर्शविण्यात आल्याप्रमाणे (डब्ल्यू चे प्रादेशि भाग) शिफारस केलेले किमान स्तर (Y to B१)			**X**		**३५.२६%**	**२१.५९%**	**४३.१५%**
जलसंपदा विकास	५०.०	W ची टक्केवारी	Y	७२१७	२५४५	१५५८	३११४
लाभक्षेत्र विकास	८.०	W ची टक्केवारी	Z	११५५	४०७	२४९	४९८
जलसंधारण	१०.०	W ची टक्केवारी	A1	१४४३	५०९	३१२	६२३
पिण्याचे पाणी व स्वच्छता	१२.०	W ची टक्केवारी	B1	१७३२	६११	३७४	७४७
उर्वरित प्रदेशनिहाय (एस ते व्ही व वाय ते बी १ करिता)		W-(Y:B1)	C1	२८८७	१०१८	६२३	१२४६
प्रदेशनिहाय जलक्षेत्राचे नियतवाटप			W	१४४३५	५०९०	३११६	६२२९
एकूण प्रादेशिक जलक्षेत्राचे नियतवाटप		(S+T+U+V+W)	D1	१५७७६	५७८७	३२८७	६७०२
एकूण प्रादेशिक जलक्षेत्राचे नियतवाटप (टक्केवारी)	D१चा प्रादेशिक हिस्सा		E1		३६.६८%	२०.८३%	४२.४९%
भाग चार							
संपूर्ण प्रदेशनिहाय नियतवाटप					विदर्भ	मराठवाडा	उर्वरित महाराष्ट्र
एकूण प्रादेशिक पाणी क्षेत्राचे नियतवाटप	E किंवा D१ येथे असल्याप्रमाणे		D१	१५७७६	५७८७	३२८७	६७०२
प्रादेशिक सर्वसाधारण योजना (पाण्याशिवाय)	G येथे असल्याप्रमाणे		G	२२०८६	६७९७	६२९७	८९९१
संपूर्ण प्रादेशिक वाटपयोग्य योजनांतर्गत नियतवाटप	(D१+G)		F१	३७८६१	१२५८४	९५८४	१५६९३
संपूर्ण प्रादेशिक वाटपयोग्य योजना (टक्केवारीमध्ये)	F१ चा संपूर्ण प्रादेशिक हिस्सा		G१		३३.२४%	२५.३१%	४१.४५%

केळकर समितीच्या काही प्रमुख शिफारशी

योजनांतर्गत साधनसंपत्तीचे प्रादेशिक नियतवाटप:

- अनुसूचित जाती/जमाती उपयोजना यांच्यासाठी ठेवलेला नियतव्यय वजा करुन योजनांतर्गत साधनसंपत्तीची सर्वप्रथम सर्वसाधारण क्षेत्र व जल क्षेत्र यांमध्ये ७०:३० प्रमाणात विभागणी करण्यात यावी.
- प्रत्येक प्रदेशाने, उर्वरित जलक्षेत्र नियतवाटपापैकी जलस्त्रोत विकासाकरिता ५० टक्के लाभक्षेत्र विकासाकरिता ८ टक्के जलसंधारणाकरिता १० टक्के आणि पेयजल व स्वच्छता याकरिता १२ टक्के असे नियतवाटपाच्या निर्धारित स्तरांचे अनुपालन केले पाहिजे.

एकूण प्रादेशिक नियतवाटपाची टक्केवारी:

- निर्धारित स्तरावरील क्षेत्रीय नियतवाटपाकरिता, जसे ''दळणवळण (वाहतूक मार्ग) जाळे कृषि व संलग्न सेवा, वीज,सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण'' यांना विभाज्य राज्य सर्वसाधारण योजनेच्या अनुक्रमे २० टक्के, १५ टक्के, ८ टक्के, ११ टक्के व ११ टक्के याप्रमाणात नियतवाटप करण्यात यावे, अशी समितीने शिफारस केली आहे. तसेच प्रादेशिक विकास मंडळांनी प्रादेशिक स्तरावर क्षेत्रीय टक्केवारीचे अनुपालन करावे.

सुशासन: महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण आणि उत्तरदायित्वे:

- अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री आणि कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्या प्रदेशातील वरिष्ठ मंत्री तसेच उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री, राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष, त्या प्रदेशातील सर्व मंत्री, दोन विधानसभा सदस्य, दोन विधान परिषद सदस्य, महानगरपालिकेचे दोन महापौर, नगरपरिषदेचे दोन अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे दोन अध्यक्ष, त्या प्रदेशातील दोन सामान्य नागरिक आणि दोन तज्ज्ञ यांचा अंतर्भाव असलेल्या प्रादेशिक विकास मंडळाची पुनर्रचना करून ती कार्यक्षम करावी. प्रादेशिक मंडळाकडे त्या प्रदेशाच्या विकास आराखड्याचे नियोजन, पर्यवेक्षण व सनियंत्रण याची जबाबदारी सोपविण्यात यावी.
- नागपूर करारातील प्रमुख बाबींना चालना देण्यासाठी महत्त्वाच्या मंत्रालयीन विभागांची तीनही प्रदेशांमध्ये समन्यायी विभागणी व्हावी. नागपूर कराराच्या पालनाच्या अनुषंगाने अनेक संचालनालये नागपूर व औरंगाबाद यथे स्थलांतरित करण्यात यावीत.
- विदर्भाच्या खनिज संपत्ती मधून मिळणारे स्वामित्वधन हे स्थानिक क्षेत्र विकासासाठीच निर्बंधित (Ring Fenced) असावे. त्याच प्रमाणे स्वामित्वधन हे सरसकट मूल्यानुसार ठरविण्यात यावे आणि ठराविक कालावधी नंतर त्यात सुधारणा करण्यात यावी.

जलसंपत्तीचा विकास:

- मराठवाडा प्रदेशाकरिता, न्यायाधिकरणाचा निवाडा, पाण्याच्या वापराचे प्रमाण निर्बंधित करतो. या निवाड्याचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे.
- विदर्भ प्रदेशामधील 'माजी मालगुजारी' तलावांचे नूतनीकरण करण्यात यावे आणि त्यांची साठवण क्षमता देखील वाढविण्यात यावी. जेणेकरुन एक लाख हेक्टर्स पेक्षा अधिक जमीन सिंचनाखाली येईल.
- वैनगंगा-प्राणहिता-इंद्रावती खोऱ्यामधील नियोजन न केलेल्या जलसंपत्तीचे पुढील पाच वर्षामध्ये नियोजन करण्यात यावे.
- विदर्भामधील अपूर्ण असलेले प्रकल्प प्राधान्यक्रमाने तातडीने पूर्ण करण्यात यावेत आणि वैनगंगा व तिच्या उपनद्यांमधील जलसंपदाही बंधारे व उपसाजलसिंचनाद्वारे वापरण्यात यावी.
- भूजल ह्या सिंचनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून तो एक स्वतंत्र विकास निर्देशांक म्हणून समजण्यात यावा.
- शास्त्रीय जलधारी मानचित्रणाच्या (scientific aquifer mapping) आधारावर पर्जन्य जलसंचयन उपक्रम हाती घेण्यात यावेत. प्रत्येक ठिकाणाला व स्थितीला योग्य अशा आवश्यक त्या उपाययोजना भूजल तज्ज्ञांच्या शिफारशींच्या आधारावर तयार कराव्यात.
- पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत तापी नदीचे खोरे हे पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेले खोरे आहे. अशा प्रकारे नर्मदेच्या पाण्याचा राज्याचा अतिरिक्त हिस्सा कमी पाणी असणाऱ्या खानदेश प्रदेशाकरिता वापरण्यात यावा.
- पश्चिम महाराष्ट्रामध्ये कायम दुर्भिक्ष्य असणाऱ्या जास्त उंचीवर पाणी उचलावयास एक विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात यावी. तसेच मोठया प्रमाणावर पाणलोट करण्यात यावे. तसेच पश्चिम महाराष्ट्रात पाण्याचे वितरण पाईपलाईनद्वारे करण्यात यावे.
- कोकण प्रदेशानं ''जल कुंड'', लघुसिंचन योजना, तातडीने राबविण्यात याव्यात तसेच पूर नियंत्रणाकरिता स्वतंत्र विशेष तरतुदी करण्यात याव्यात.

समर्थन प्रकाशने

◈ प्रगतिपुस्तक महाराष्ट्राचे - विकासाची बेटे . . . . दारिद्र्याचा महासागर (डिसेंबर २०१०)
◈ आदिवासी उपयोजना संक्षिप्त अहवाल (मार्च २०१०)
◈ महाराष्ट्र विधिमंडळाच्या विषय समित्यांची शोकांतिका अहवाल
◈ महाराष्ट्रातील निवडक क्षेत्रांचा आढावा (२००९)
◈ राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या मार्गदर्शक सूचना (२००९)
◈ आदिवासी उपयोजना संदर्भ पुस्तिका
◈ सत्तेच्या सारीपाटावरील योजनांचे काय ?
◈ मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३
◈ वंचितांच जिणं - वडार समाजाच्या समस्यांविषयी (लेखक - नितीन पाटील)
◈ प्रसारमाध्यमं - ॲडव्होकसी अभ्यास
◈ माहितीचा अधिकार - मार्गदर्शिका
◈ आदिवासी स्वशासन कायदा
◈ अत्याचार प्रतिबंधक कायदा
◈ महात्मा फुले शिक्षण हमी योजना माहितीपुस्तक
◈ रोजगाराची हमी धोक्यात
◈ विधिमंडळ - रचना व कार्यपद्धती
◈ राष्ट्रीय पोलीस आयोग
◈ उद्ध्वस्त बालपण - प्राथमिक शिक्षणविषयक
◈ शापित - आरे कॉलनी येथील आदिवासींच्या समस्या (लेखक - नितीन पाटील)
◈ महाराष्ट्र संदर्भ पुस्तिका
◈ आपला अर्थसंकल्प (लेखक - हेमंत देसाई)
◈ आपले विधिमंडळ 'संक्षिप्त परिचय' (जानेवारी २०१३)
◈ विधिमंडळ अर्थसंकल्पीय कामकाज - नियम व वास्तव (मार्च, २०१२)
◈ महाराष्ट्र विधिमंडळ - प्रभावी कामकाजासाठी (संक्षिप्त मार्गदर्शिका) (डिसेंबर २०१४)
◈ संक्षिप्त टिपण : * कुपोषण बालकांचे नव्हे तर . . शासन व्यवस्थेचे, * आश्रमशाळांची दुरवस्था..
* शासनाची अजून कोरीच पाटी, आमच्या हाती मात्र विटा - माती.
◈ विभागवार वार्षिक अर्थसंकल्पीय टिपण : सर्वसाधारण अर्थसंकल्प, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण, महिला व बाल कल्याण, कृषि, गृह, रोजगार व स्वयंरोजगार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

केळकर समितीचा अहवाल का वाचावा ?
काही ठळक वैशिष्ट्ये..

- *दांडेकर समितीचे सूत्र पत्करून विदर्भाचा विकास पुढची काही दशकंदेखील लांबत राहील.*
- *निव्वळ सरकारी खर्चाच्या तफावतींमुळे विकासाची दरी तयार झालेली नाही. ती दूर करण्यासाठी आर्थिक विकासाची गती वाढवणारी धोरणे पत्करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रचलित असलेल्या वैधानिक मंडळाची रचना उपयोगाची नाही. तर राजकीय प्रतिनिधीत्व आणि उत्तरदायित्व असलेल्या प्रादेशिक विकासाची यंत्रणा अस्तित्वात आणली पाहिजे.*
- *जनतेच्या मनातील राजकीय अविश्वास आणि विश्वासातील तूट आणि आर्थिक विकासाची तूट असे दुहेरी आव्हान आहे. यासाठी राजकीय पक्षांच्या मर्यादा ओलांडून सर्वच पक्षांनी पुढच्या दीड-दोन दशकात ही विकासातील कमतरता भरून काढण्यासाठी एकत्र प्रयत्न केले पाहिजेत.*
- *विकास खुंटण्यामागे कळीचे कारण पाण्याचे नियोजन, वापर व धोरण यात मूलगामी प्रयत्न सचोटीने पाहिजेत.*
- *आर्थिक मागासपण फक्त भौगोलिक प्रदेशांनुसार न बघता, दुष्काळी व आदिवासी भागांसह त्याचा विचार करावयास पाहिजे.*
- *असे अनेक वास्तवदर्शी निष्कर्ष व शिफारशी केळकर समितीने मांडल्या आहेत.*

(सदर अहवाल महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)